सुविचार

जब दूसरे गलतियाँ करते हैं तो उनको गिनते न रहिए । उनका विश्वास जीतिये ताकि आप उनकी कमजोरियों को मिटाने में सहयोग दे सकें ।

(ब्रह्मकुमारीज)

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/बुधवार दि. २७ मार्च २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१३२ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


## पंतप्रधान मोदींची मेरठमध्ये मोठी रॅली

### अरूण गोविल (रामयणातील राम) भाजपचे उमेदवार

नवी दिल्ली: भारतीय जनता पक्ष आगामी लोकसभा निवडणुकीसाठी सर्वाधिक जागा असलेले राज्य उत्तर प्रदेशातून आपल्या निवडणूक प्रचाराची सुरूवात करत आहे. याची सुरूवात ३० मार्चपासून होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी मेरठ येथून एक मोठी रॅली काढून याची सुरूवात करतील. यादरम्यान जयंत चौधरीही त्यांच्यासोबत असतील. भाजपाने मेरठ लोकसभा मतदार संघातून अरूण गोविल यांना तिकीट दिले आहे.

भाजपने उत्तर प्रदेशातील ६४ जागांवर आपल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. यात २४ मार्चला पक्षाने राज्यातील १३ उमेदवारांची यादी जाहीर केली होती. येथे माजी केंद्रीय मंत्री मेनका गांधी यांना सुल्तानपूर येथून पुन्हा संधी मिळाली आहे. त्यांचे सुपुत्र आणि पिलभीतचे खासदार वरूण गांधी यांचे तिकीट कापण्यात आले आहे. त्यांच्या जागी जितीन प्रसाद यांना मैदानात उतरवण्यात आले आहे.

भाजपने पाचव्या यादीत उत्तर प्रदेशातील एकूण १३ उमेदवार घोषित केले होते. यात पक्षाने आपल्या ९ सध्याच्या खासदारांना संधी दिली नाही. पक्षाने ज्या नऊ खासदारांचे तिकीट कापले त्यात गाझियाबादचे खासदार वीके सिंह, पिलभीतचे खासदार वरूण गांधी, बरेलीचे खासदार संतोष गंगवार, कानपूरचे सत्यदेव पचौरी, बदायूंचे माजी मंत्री स्वामी प्रसाद मौर्या यांची सुपुत्री डॉक्टर संघमित्रा मौर्य, बाराबंकी येथून उपेंद्र सिंह रावत, हाथरस येथून राजवीर सिंह दिलेर, बहराईच येथून अक्षयवर लाल गौड आणि मेरठचे खासदार राजेंद्र अग्रवाल यांचा समावेश आहे.

## राहुल गांधींविरोधात कुन्नूमेल सुरेंद्रन भाजपाचे उमेदवार

तिरुअनंतपुरम : काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या उमेदवारीमुळे मागील लोकसभा निवडणुकीपासूनच हाय प्रोफाईल झालेल्या केरळमधील वायनाड मतदारसंघातील लढत यावेळी चुरशीची होण्याची शक्यता आहे. इंडिया आघाडीतील घटक पक्ष असूनही भारतीय कम्युनिस्ट पक्षाने सरचिटणीस डी. राजा यांच्या पत्नी नी राजा यांना वायनाडमधून उभे केल्यानंतर आज भाजपनेही प्रदेशाध्यक्ष के. सुरेंद्रन यांना या मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे या मतदारसंघातील लढतीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागणार आहे.



भाजपने आज केरळमधील आपले चार उमेदवार जाहीर केले. सुरेंद्रन यांना वायनाडमधून उमेदवारी देतानाच भाजपने श्री शंकरा संस्कृत विद्यापीठाचे माजी कुलगुरू के. एस. राधाकृष्णन यांना एर्नाकुलम, अभिनेते जी. कृष्णकुमार यांना कोल्लम आणि माजी प्राध्यापक टी. एन. सरसू यांना अलातूर मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. केरळमध्ये अनेक वर्षांपासून काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त (पान ७ वर)

## भाजपकडून आतापर्यंत १०१ विद्यमान खासदारांना डच्चू

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्ष एक एक करत आपल्या उमेदवारांची नावे जाहीर करत आहेत. भारतीय जनता पक्षाने आतापर्यंत ६ याद्या जाहीर केल्या आहेत, ज्यात एकूण ४०५ उमेदवारांची नावे समोर आली आहेत. आश्र्चर्याची बाब म्हणजे, पक्षाने विद्यमान २९१ खासदारांपैकी १०१ खासदारांची तिकिटे कापली आहेत. भाजपने पहिल्या यादीत ३३, दुस-या यादीत ३०, पाचव्या यादीत ३७, तर सहाव्या यादीत एका खासदाराचे तिकिट कापले आहे. यामध्ये अनेक मंत्र्यांचाही समावेश आहे.

भाजपने ज्या बड्या खासदारांची तिकिटे कापली, त्यात वरुण गांधी, प्रज्ञा ठाकूर, रमेश बिधुरी, दर्शना जरदोश, रमेश पोखरियाल निशंक, प्रताप सिम्हा, व्हीके सिंह, अनंत हेगडे, अश्र्विनी चौबे, हर्षवर्धन, गौतम गंभीर यांसारख्या मोठ्या नावांचा समावेश आहे. पक्षाने मणिपूरच्या तिन्ही खासदारांची तिकिटे कापली आहेत. मणिपूरमधील सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन पक्षाने नव्या चेह-यांना संधी देण्याचा निर्णय घेतला. आकडेवारीवर नजर टाकली, तर भाजपने आतापर्यंत जवळपास ३४ टक्के खासदारांना डच्चू दिला आहे. विशेष बाब म्हणजे, २०१९ मध्येही भाजपने आपल्या तत्कालीन २८२ खासदारांपैकी ११९ खासदारांची तिकिटे कापली होती. म्हणजेच त्यावेळी सुमारे ४२ टक्के खासदारांना पुन्हा तिकीट मिळाले नव्हते. सत्ताविरोधी लाट टाळण्यासाठी भाजपने हे पाऊल उचलले होते. यावेळी सत्ताविरोधी लाट, वादग्रस्त वक्तव्ये आणि स्थानिक कार्यकर्त्यांची नाराजी लक्षात घेऊन पक्षाने आतापर्यंत १०१ खासदारांची तिकिटे कापली आहेत.

आणखी खासदारांची तिकिटे कापली जाणार

भाजप आणखी किमान ३०-४० उमेदवार जाहीर करणार असून यापैकी अनेक विद्यमान खासदारांना डच्चू मिळण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ, वादग्रस्त (पान ७ वर)

## संविधानाने दिलेले प्रत्येक अधिकार उपभोगणे गरजेचे नाही

भोपाळ : मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने नुकतचे सुरक्षा मागणा-या एका तरुण लिव्ह-इन जोडप्यावर नाराजी व्यक्त केली. न्यायमूर्ती सुबोध अभ्यंकर, पालकांच्या इच्छेविरुद्ध एकत्र राहणा-या किशोरवयीन जोडप्याला संरक्षण देण्याची मागणी करणा-या याचिकेवर सुनावणी करत होते. यावेळी न्यायालयाने टिप्पणी केली की, भारतीय राज्यघटनेने अधिकार दिले असले तरीही काही अधिकारांचा उपभोग घेणे किंवा त्यांची अंमलबजावणी करणे नेहमीच आवश्यक नसते.

यावेळी न्यायालयाने जरी किशोरवयीन मुलांना संरक्षण नाकारले नसले तरी, आजकालच्या तरुणांच्या निवडीबद्दल चिंता व्यक्त केली. आजकालचे तरुण करत असलेल्या निवडीबद्दल चिंता वाटते. या विषयावर विचार करण्यासारखे बरेच काही असले तरी, हे लक्षात ठेवले पाहिजे की संविधानाने काही अधिकार दिलेले असले तरी प्रत्येकवेळी ते उपभोगणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक नाही. यामुळे स्वाभाविकपणे शाळा किंवा महाविद्यालयात जाण्याची शक्यता कमी होईल. तसेच जीवनाच्या सुरुवातीला जर तुम्हाला संघर्ष करावा लागला, तर जीवनाच्या इतर संधींचा आनंद घेण्याच्या तुमच्या शक्यतांवरच परिणाम होईल असेही ते पुढे म्हणाले.

या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायालयाने असेही नमूद केले की, जर एखादी मुलगी लहान वयात गर्भवती झाली तर तिला अतिरिक्त अडचणींना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे मुलींनी आपल्या निवडी करताना सावधगिरी बाळगावी असा सल्ला दिला. अशा निवडी करताना आणि अधिकारांचे आवाहन करताना विवेकबुद्धी वापरण्याचा सल्ला दिला जातो, कारण अधिकार असणे एक गोष्ट आहे आणि त्यांची अंमलबजावणी करणे दुसरी गोष्ट आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

याचिकेला परवानगी

(पान ७ वर)

## जहाजाच्या धडकेने पूल कोसळला

वॉशिग्टिंन : अमेरिकेतील बाल्टिमोर शहरातील फ्रान्सिस स्कॉट ब्रिज हा पूल जहाज धडकल्याने कोसळले. मेरीलँड ट्रान्सपोर्ट ऑथॅरिटिने यासंदर्भातील माहिती दिली. यासंदर्भातील व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. ही मोठी दुर्घटना असून अनेक वाहने पाण्यात पडल्याची माहिती आहे.

अमेरिकेच्या स्थानिक वेळेनुसार १:३५ वाजता ही दुर्घटना घडली. काही सेकंदामध्येच ब्रिज कोसळला आहे. अपघातानंतर दोन्ही बाजूंची वाहतूक थांबवण्यात आली. तसेच लोकांना वेगळ्या मार्गाने जाण्याच्या सूचना करण्यात आल्या. माहितीनुसार, अनेक वाहने पाण्यात पडली आहेत. (पान ७ वर)

## मुंबई बनली आशियातील अब्जाधिशांची राजधानी

मुंबई : प्रतिनिधी- मुंबईने प्रथमच आशियातील अब्जाधीशांची राजधानी म्हणून बीजिंगला मागे टाकले आहे. हुरून रिसर्च इन्स्टिट्यूटच्या ताज्या अहवालानुसार, मुंबई बीजिंगला मागे टाकत आशियातील अब्जाधीशांची नवीन राजधानी म्हणून उदयास आली आहे. ही एक उल्लेखनीय कामगिरी आहे. भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत आता ९२ अब्जाधीश आहेत. संपत्ती निर्मितीसाठीचे एक भरभराटीचे केंद्र म्हणून मुंबईने आपला दर्जा आणखी मजबूत केला आहे.

मुंबई ९२ अब्जाधीशांसह न्यूयॉर्क (११९) आणि लंडन (९७) नंतर जगात तिस-या स्थानी आहे. भारताच्या २७१ अब्जाधीशांच्या यादीत नवीन ९४ लोकांचा समावेश झाला आहे. २०१३ पासून हे प्रमाण सर्वाधिक आहे, असेही अहवालात म्हटले आहे.

हुरुन ग्लोबल रिच लिस्ट २०२४ असे शीर्षक असलेल्या अहवालात मुंबईच्या वेगवान वृद्धीवर प्रकाश टाकण्यात आला आहे. मुंबई ही जगातील सर्वांत वेगाने वाढणारी अब्जाधीश राजधानी आहे. मुंबईत वर्षात २६ अब्जाधीशांची भर पडली असून ती जगात तिस-या क्रमांकावर आहे. तसेच ती आशियातील अब्जाधीशांची राजधानी बनली आहे. नवी दिल्ली प्रथमच टॉप १० मध्ये आली आहे.फ असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

अब्जाधीशांच्या संख्येतील उल्लेखनीय वाढीमुळे भारताचे आर्थिक विलक्षण कौशल्य आणखी अधोरेखित झाले आहे. देशात आश्चर्यकारकपणे ९४ नवीन अब्जाधीश झाले आहेत. हे प्रमाण अमेरिका वगळता इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत सर्वाधिक आहे. देशात एकूण २७१ व्यक्ती अब्जाधीश आहेत. ही वाढ, २०१३ नंतरची सर्वाधिक आहे. हा भारतीय अर्थव्यवस्थेतील (पान ७ वर)

## डिपॉझिट जप्त उमेदवारांची संख्या वाढली

नवी दिल्ली : सार्वत्रिक निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव मानला जात असल्याने देशातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या या उत्सवात सहभागी होत असते. बहुतांश जण मतदार म्हणून आपले कर्तव्य बजावतात, तर राजकीय पक्षाचे पाठबळ नसतानाही काही जण विशिष्ट उद्देशाने निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतात. मात्र, मतदारांचे अपेक्षित पाठबळ न मिळाल्याने त्यांच्यावर अनामत रक्कम जप्त होण्याचीही वेळ ओढवते. अशा डिपॉझिट जप्त उमेदवारांचे प्रमाण वाढत असल्याचे निवडणूक आयोगाच्या आकडेवारीवरून दिसून आले आहे.

एखाद्या मतदारसंघात झालेल्या एकूण वैध मतदानापैकी एक षष्ठमांश मते न मिळाल्यास संबंधित उमेदवाराची अनामत रक्कम जप्त होते. उरलेल्या उमेदवारांना निवडणुकीत पराभव झाला तरी ही रक्कम परत मिळते. आयोगाकडील आकडेवारीनुसार, १९५१ पासून ते २०१९ पर्यंतच्या लोकसभा निवडणुकांमध्ये मिळून ७१ हजारहून अधिक उमेदवारांना अनामत रक्कम गमवावी लागली आहे. २०१९ मधील निवडणुकीत तर एकूण पात्र उमेदवारांपैकी ८६ टक्के उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे.

अनामत रकमेची रक्कमही वाढत गेली आहे. भारतात एखाद्या उमेदवाराची अनामत रक्कम जप्त होणे, ही त्याच्यासाठी लाजिरवाणी बाब मानली जाते. प्रचारावेळी एकमेकांना आव्हान देताना उमेदवार ङ्कविरोधकांचे डिपॉझिट जप्त होईलफअसे म्हणत स्वत:चे राजकीय बळ दाखवत असतात. मागील निवडणुकीत बसपच्या ३८३ उमेदवारांपैकी ३४५ उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली होती.

## महायुतीचे जागावाटप गुरूवारी जाहीर होणार

मुंबई (प्रतिनिधी) : महायुतीतील जागावाटप ९९ टक्के पूर्ण झाले आहे. जागावाटपाबाबत महायुतीत कोणतेही गैरसमज नाहीत. येत्या २८ मार्चला मुंबईत महायुतीची संयुक्त पत्रकार परिषद होणार असून जागावाटपाबाबत अधिकृत घोषणा करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. रायगड लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या उमेदवारीची घोषणाही अजित पवार यांनी केली आहे. बारामती लोकसभा मतदारसंघातील उमेदवार कोणत्याही परिस्थितीत बदलणार नाही. उमेदवार बदलण्याच्या केवळ अफवा असून तुमच्या मनात जो आहे तो उमेदवारच तिथे देण्यात येईल, असे स्पष्ट करतानाच सुनेत्रा पवार यांनाच बारामतीतून उमेदवारी मिळणार असल्याचे स्पष्ट संकेत अजित पवार यांनी दिले.



५ वर्षांपूर्वी लोकसभा निवडणुका झाल्या त्या वेळी ४८ जागा होत्या. आम्ही महाविकास आघाडीच्या वतीने लढलो होतो. त्यामध्ये भाजपाच्या २३ जागा निवडून आल्या. शिवसेनेच्या १८ जागा निवडून आल्या आणि ४ राष्ट्रवादी काँग्रेसला मिळाल्या होत्या. आम्ही नवनीत राणा यांना पुरस्कृत केले होते तर एमआयएमची १ जागा अशा निवडून आल्या होत्या मात्र माध्यमांमध्ये कारण नसताना राष्ट्रवादी फक्त ३ जागा लढवणार, अशा पध्दतीने गैरसमज पसरवण्याचे काम करण्यात आले. आमच्या महायुतीत कुणाचेही गैरसमज नाहीत. मित्र पक्षांनी २३ जागा निवडून आणल्या आहेत तेवढ्या जागा मिळाव्यात, अशी अपेक्षा होती. त्यात एकत्र बसून अतिशय व्यवस्थित मार्ग काढलेला आहे, असेही अजित पवार यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्र्यांवर एक-एक लोकसभा आणि आमदारांवर एक-एक विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी टाकण्यात आली आहे. बाकीची टिम आमची काम करणारच आहे शिवाय जिथे महायुतीचे उमेदवार असतील तिथे मंत्री व आमदारांनी उमेदवार निवडून आणण्यासाठी काम करायचे आहे, असेही ठरल्याचे अजित पवार यांनी सांगितले. जाहीरनाम्यावर काम सुरू आहे तो लवकरच दिला जाईल. स्थानिक प्रश्न आहेत तेही त्या जाहीरनाम्यात यावेत, अशी भूमिका आहे. स्टार (पान ७ वर)



सह्याद्री वलसे हिची डीवायेसपी पदी निवड झाल्याबद्दल अँड बळवंत भाऊ जाधव यांनी सत्कार केला त्या वेळी अँड परवेझभाई पठाण , विजयकुमार कांबळे, अँड अर्जुन जाधव, अँड अमर बाहेती यांनी अभिनंदन केले

## थकीत कराच्या वसुलीसाठी मालमत्तांना ठोकले सील मनपाची कारवाई

### नागरिकांनी मालमत्ता कर लवकरात लवकर भरण्याचे आवाहन



लातूर/प्रतिनिधी: मालमत्ता कर थकीत असणाऱ्या दोन मालमत्तांना मनपाच्या पथकाने मंगळवारी (दि.२६ ) सील ठोकले. वारंवार नोटिसा देऊनही कर भरणा केला जात नसल्याने पालिकेच्या वतीने ही कारवाई करण्यात आली.

मालमत्ताधारकांनी आपल्याकडील कर लवकरात लवकर भरणा करावा अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल असा इशाराही मनपाच्या वतीने देण्यात आला.

लातूर एमआयडीसी परिसरातील धीरज टाइल्स यांच्याकडे २३ लाख ४४ हजार ६७१ रुपये थकबाकी होती.तसेच पॅनिका एनर्जी यांच्याकडेहि मालमत्ता करापोटी ३१ लाख रुपये कर थकलेला होता.या दोन्ही मालमत्तांना मंगळवारी मनपाच्या वतीने सील ठोकण्यात आले.

मनपा उपायुक्त शुभम क्यातमवार यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली.कर अधिक्षक सतीश टेंकाळे मनपाचे पथक प्रमुख समाधान सूर्यवंशी, जे.एम.ताकपिरे, सहाय्यक पथक प्रमुख चंद्रकांत बावगे, कर निरीक्षक प्रदीप जोगदंड, वसुली लिपिक संतोष फिसके, कुरकुट यांच्या पथकाने ही कारवाई करण्यात आली.

एमआयडीसी परिसर, कृषी उत्पन्न बाजार समिती परिसर तसेच शहराच्या इतर भागात ज्या नागरिकांचा मालमत्ता कर थकलेला आहे अशा मालमत्ता धारकांनी आपल्याकडील कराची थकबाकी दिनांक ३१ मार्च पूर्वी मनपाकडे जमा करून व्याज माफी योजनेचा लाभ घ्यावा. वेळेच्या आत मालमत्ता कराचा भरणा करण्यात आला नाही तर थकीत मालमत्ता धारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल,असा इशाराही मनपाकडून देण्यात आला आहे.

## आ.अमित देशमुख यांनी लातूर शहर मतदारसंघातील २७ गावातील बुथ प्रमुखांची घेतली बैठक

लातूर / प्रतिनिधी- लातूर लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडी काँग्रेसकडून डॉ. शिवाजी काळगे यांना अधिकृत उमेदवारी मिळाली आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मंगळवार दि. २६ मार्च रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहर मतदारसंघातील बाभळगाव, महापूर, हनमंतवाडी, कातपुर, गंगापूर, वासनगाव पाखर सांगवी, शिरसी आदी सत्तावीस गावातील बूथ प्रमुखांची बैठक घेऊन लातूर लोकसभा मतदार संघातील निवडणुकीच्या कामाला लागावे, अशा सूचना केल्या आहेत.



यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अमर खानापुरे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, लातूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुभाष घोडके, सचिन बंडापल्ले, गणेश एसआर देशमुख, तानाजी फुटाणे पंडित ढमाले, रघुनाथ शिंदे, डॉ. सतीश कानडे, गोविंद देशमुख, प्रताप पाटील संजय निलेगावकर आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी लातूर शहर मतदार संघातील २७ गावातील विविध पदाधिकारी सर्व बूथ प्रमुख उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अमर खानापुरे यांनी बुथ प्रमुखांना दिलेल्या सर्व सूचना अमलात आणाव्यात असे सांगून बुथनिहाय कामाचे नियोजन करण्याच्या सुचना दिल्या. पुढे बोलताना ते म्हणाले की ही निवडणूक म्हणजे वैचारिक युद्ध आहे हे विचारानेच लढावे लागेल, डोअर टू डोअर कॅम्पेन दोन वेळा करावे ते करताना पहिल्या टप्प्यात जाहीरनामा, उमेदवाराचा परिचय पत्र मतदारांना द्याव, दुसऱ्या टप्प्यात पोलचिट द्यावी. लातूर काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला आहे लोक आग्रहातून सुसंस्कृत सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉक्टर शिवाजी काळगे यांना उमेदवारी देण्यात आलेली आहे. लोकसभा नंतर विधानसभा त्यानंतर जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका आहेत या क्षणापासून प्रत्येकाने कामाला लागावे प्रत्येकाने प्रचारासाठी मेहनत घ्यावी लढून आपल्याला जिंकायचे आहे. देशात राज्यात जिल्ह्यातील मुद्द्यावर लोकसभा निवडणुका होतील, पण काँग्रेस कार्यकर्त्यांनीही मतदारांच्या दारापर्यंत जावे लातूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य व्यक्ती लोकसभेत गेली पाहिजे (पान ७ वर)

दैनिक
यशवंत
बुधवार दि.२७ मार्च २०२४
२
अहमदपूर/चाकूर परिसर
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

# दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेच्या निषेधार्त आम आदमी पार्टीचे निवेदन

# यशवंत जू. कॉलेज येथे मतदान जनजागृती अभियान अंतर्गत संकल्पपत्र उपक्रम संपन्न

अहमदपूर दि.२६(कारामुंगीकर) यशवंत जू. कॉलेज येथे मतदान जनजागृती अभियान अंतर्गत संकल्पपत्र उपक्रम संपन्न झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील यशवंत जुनियर कॉलेज येथे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी लातूर व शिक्षणाधिकारी लातूर यांच्या सूचनेनुसार (डथएएझ) मतदान जनजागृती अभियानांतर्गत संकल्पपत्र मोहीम राबविण्यात आली. यावेळी मंचावर उपप्रचार्य प्रा. सय्यद एम. यु., डॉ. बालाजी कारामुंगीकर, प्रा. चिवडे निळकंठ आदींची उपस्थिती होती.



यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना उपप्राचार्य प्रा. सय्यद एम. यु. म्हणाले की, मतदान हा लोकशाहीचा प्रमुख आधारस्तंभ आहे. राष्ट्राच्या उन्नतीसाठी शंभर टक्के मतदान होणे गरजेचे आहे. अठरा वर्ष पूर्ण झालेल्या सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळतो. हा अधिकार भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेला आहे. देशातील सर्वात मोठ्या लोकशाही महोत्स–वात पुरुषांसोबत महिलांचाही सहभाग वाढला पाहिजे आणि शंभर टक्के मतदान झाले पाहिजे. २५ जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. शंभर टक्के मतदान करून मतदानाचे एक नवीन लातूर पॅटर्न निर्माण करूयात असा संकल्प ही यावेळी करण्यात आला. १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मदिवस मतदार जागर दिवस म्हणून साजरा करूया. असेही ते शेवटी म्हणाले.



यावेळी प्रा. ननीर सतीश रामकृष्ण, प्रा. चिद्रे शिवशंकर मल्लिकार्जुन, क्षीरसागर नंदकुमार लक्ष्मण, प्रा. पाटील शिवशंकर ईश्वर राव, प्रा.पुणे रवीकुमार गुरुनाथ, प्रा. येलमटे सुरेंद्र श्रीराम, प्रा. घटकार शिवाजी तुळशीराम, प्रा.स्वामी विश्वंभर, प्रा. पटवारी अनमोल शिवराज, प्रा. इरफळे रविशंकर शिवराज, प्रा. देशमुख राहुल अशोकराव, प्रा.सांगवीकर माधुरी प्रा.बोधने स्नेहल, कांबळे मोहन यासह विद्यार्थी विद्यार्थिनी यांची उपस्थित होती.

अहमदपूर दि.२६(कारामुंगीकर) शंभर कोटी रुपयांच्या कथित दिल्ली मद्य धोरण घोटाळ्यात ईडीने दिल्लीचे मुख यमंत्री अरविंद केजरीवाल यांना गुरुवारी रात्री अटक केल्याच्या निषेधार्त आम आदमी पार्टीच्या वतीने तह–सीलदार यांना निवेदन देण्यात आले आहे.





याविषयी सविस्तर माहीती अशी की, आम आदमी पार्टी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना शंभर कोटी रूपयांच्या कथित दिल्ली मद्य धोरण घोटाळ्याच्या आर–ोपाखाली गुरुवारी दिल्ली येथे ईडीच्या पथकाने त्यांच्या निव–ासस्थानी तब्बल दोन तास चौकशी करून अटक केली आहे

या अटकेच्या निषेधार्त आम आदमी पार्टी अहमदपूर यांच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले की, भारत सरकारणे देशात अघोषीत आणीबाणी चालू केलेली आहे. लोकशाही वाचविण्यासाठी आवाज उठवणारे नेते कार्यकत्यांच्या विरोधात दडपशाही चालू केलेली आहे. कहर म्हणजे दिल्लीचे मुख्यमंत्री राष्ट्रीय नेते दिल्ली राज्याचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे विकास पुरुष आहेत व भ्रष्टाचार विरोधी काम करीत आहेत म्हणून बेकायदेशीर पणे दि. २१/०३/२०२४ रोजी त्यांना भारत सरकारने (ई.डी.) अटक केलेली आहे.

सदर अटक बेकायदेशीर व लोकशाहीची हत्या करण्यात येत आहे म्हणून आम्ही अरविंद केजरीवाल यांच्या अटकेचा निषेध नोंदवित आहोत निवेदनावर आम आदमी पार्टी तालुका अध्यक्ष मनोहर पाटील , सचिव सुधाकर चो–ले आदींच्या स्वाक्षऱ्या आ–हेत यावेळी बि. आर.एस चे बाबुराव जंगापल्ले शिवसेना (उबाठा) चे प्रदिप चौकटे , उत्कर्ष शिंदे, हरिभाऊ कदम , ज्ञानेश्वर पवार,चेअरमन तरडे आदींची उपस्थिती होती.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार,चाकूर यांचे कार्यालयात**
**दंडणीय विभाग**
**जाहीरनामा**

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दिनांक २६.०३.२०२४
अर्जदार – **श्री पठाण अब्दुलकादर उस्मानखाँ**
विरुद्ध
गैरअर्जदार :– मुख्याधिकारी, नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चाकूर
अर्ज :– कलम १३/३ अन्वये जन्म नोंदणी कायदा.

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार **श्री पठाण अब्दुलकादर उस्मानखाँ** रा. चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांनी कलम १३/३ अन्वये जन्म मृत्यु नोंदणी कायदा अंतर्गत अर्जदार यांचा जन्म दि. १५/०६/१९८६ रोजी राहत्या घरी झाला असुन मुख्याधिकारी / नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, चाकूर ता. चाकूर जि. लातूर येथे करणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म / मृत्यु तारखेच्या नोंदणीसाठी कोणाचाही कुठलाही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप अथवा हरकत सादन न झाल्यास हे न्यायालय अर्जामध्ये ग्य तो आदेश पारीत करील. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.

दि. २६/०३/२०२४ पुढिल ता. २९/०४/२०२४
आदेशावरुन
सही/–
**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार,**
**तहसील कार्यालय, चाकुर**

प्रत : १. मुख्याधिकारी / नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांना देवून कळविण्यात येते की, सदरचा जाहिरनामा आपल्या नोटिस बोर्ड वर डकवुन पंचनामा अहवाल या कार्यालयास सादर करणेस्तण्यास्तव देण्यात येत आहे.

शिक्का
सही/–
**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार,**
**तहसील कार्यालय, चाकुर**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार,चाकूर यांचे कार्यालयात**
**दंडणीय विभाग**
**जाहीरनामा**

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दिनांक २०.०३.२०२४
अर्जदार – **श्री सय्यद चाँदसाब अब्दुलसाब**
विरुद्ध
गैरअर्जदार :– मुख्याधिकारी, नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चाकूर
अर्ज :– कलम १३/३ अन्वये जन्म नोंदणी कायदा.

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार **श्री सय्यद चाँदसाब अब्दुलसाब** रा. चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांनी कलम १३/३ अन्वये जन्म मृत्यु नोंदणी कायदा अंतर्गत अर्जदार यांचा जन्म दि. १०/०२/१९८५ रोजी राहत्या घरी झाला असुन मुख्याधिकारी / नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, चाकूर ता. चाकूर जि. लातूर येथे करणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म / मृत्यु तारखेच्या नोंदणीसाठी कोणाचाही कुठलाही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप अथवा हरकत सादन न झाल्यास हे न्यायालय अर्जामध्ये ग्य तो आदेश पारीत करील. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.

दि. २६/०३/२०२४ पुढिल ता. २९/०४/२०२४
आदेशावरुन
सही/–
**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार,**
**तहसील कार्यालय, चाकुर**

प्रत : १. मुख्याधिकारी / नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांना देवून कळविण्यात येते की, सदरचा जाहिरनामा आपल्या नोटिस बोर्ड वर डकवुन पंचनामा अहवाल या कार्यालयास सादर करणेस्तण्यास्तव देण्यात येत आहे.

शिक्का
सही/–
**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार,**
**तहसील कार्यालय, चाकुर**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार,चाकूर यांचे कार्यालयात**
**दंडणीय विभाग**
**जाहीरनामा**

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दिनांक २६.०३.२०२४
अर्जदार – **श्री सय्यद अहमद अब्दुलसाब**
विरुद्ध
गैरअर्जदार :– मुख्याधिकारी, नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चाकूर
अर्ज :– कलम १३/३ अन्वये जन्म नोंदणी कायदा.

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार **श्री सय्यद अहमद अब्दुलसाब** रा. चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांनी कलम १३/३ अन्वये जन्म मृत्यु नोंदणी कायदा अंतर्गत अर्जदार यांचा जन्म दि. ०२/०३/१९८६ रोजी राहत्या घरी झाला असुन मुख्याधिकारी / नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, चाकूर ता. चाकूर जि. लातूर येथे करणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म / मृत्यु तारखेच्या नोंदणीसाठी कोणाचाही कुठलाही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप अथवा हरकत सादन न झाल्यास हे न्यायालय अर्जामध्ये ग्य तो आदेश पारीत करील. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.

दि. २३/०३/२०२४ पुढिल ता. २९/०४/२०२४
आदेशावरुन
सही/–
**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार,**
**तहसील कार्यालय, चाकुर**

प्रत : १. मुख्याधिकारी / नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय, चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांना देवून कळविण्यात येते की, सदरचा जाहिरनामा आपल्या नोटिस बोर्ड वर डकवुन पंचनामा अहवाल या कार्यालयास सादर करणेस्तण्यास्तव देण्यात येत आहे.

शिक्का
सही/–
**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार,**
**तहसील कार्यालय, चाकुर**

# शंभर टक्के मतदान होण्यासाठी स्वीप पथकाचे लोकगीतातून आवाहन



चाकूर दि.२६(प्रतिनिधी) शंभर टक्के मतदान होण्यासाठी स्वीप पथकाने लोकगीतातून आवाहन केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, केंद्रीय निवडणूक आयोगाचे (Election Commission of India) महाराष्ट्रात २६ एप्रिल ते २५ मे पर्यंत पाच टप्प्यात मतदान प्रक्रिया पार पडणार असून लातूर जिल्ह–ातील मतदान ७ मे रोजी होणार आहे. जिल्हातील मतदार बंधू भगिणीमध्ये जनजागृती निर्माण व्ह–ावी यासाठी स्वीप कलापथकाद्वारे चाकूर तालुक्यातील मोहदळ व कबनसांगवी येथे लोकगीताच्या माध्यमातून लातूर लोकसभा मतदारसंघातील मतदानाचा टक्का वाढण्यासाठी जनजागृती करण्यात आली.

यावेळी मतदारांनी शंभर टक्के मतदान करावे असे जा–हीर आवाहन करण्यात आले.या अभियानांसाठी जिल्हाधिकारी वर्षा घुगे–ठाकुर मॅडम सहाय्यक निवडणूक अधिकारी मंजुषा लटपटे,अहमदपूर चे तहसीलद–ार शिवाजी पालेपाड,चाकूर चे तहसीलदार नरसिंग जाधव, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघात जनजागृती कार्यक्रम करण्यात येत असून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वीपचे सदस्य महादेव खळुरे, शिवकुमार गुळवे, मोहन तेलंगे, बस्वेश्वर थोटे, चंद्रकांत पेड, पुरुषोत्तम काळे, श्रीमती अर्चना माने, ना–गनाथ स्वामी, प्रमोद हुडगे, धनंजय नाकाडे आदिनी परिश्रम घेतले. गावातील नागरिक महिला मतदार बंधू भगिणिनी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमाला उपस्थितीत होते.

# रुद्र व दाक्षायणी महिला मंडळाच्या वतीने नारी शक्तीचा सन्मान

## घरात आणि समाजात नारींचा सन्मान करा–सौ.चंदाताई बाबासाहेब पाटील

अहमदपूर दि.२६(कारामुंगीकर) रुद्र व दाक्षायणी महिला मंडळाच्या वतीने नारी शक्तीचा सन्मान करण्यात आला असुन घरात आणि समाजात नारींचा सन्मान करा असे प्रतिपादन सौ.चंदाताई बाबासाहेब पाटील यांनी केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, अनादी काळापासून भारतीय संस्कृतीमध्ये महिलांना अत्यंत मानाचे स्थान असून आजही या बदललेल्या समाज संस्कृतीमध्ये घरात आणि समाजात महिलांचा सन्मान करा असे आग्रही प्रतिपादन आमदारांच्या सौभाग्यवती चंदाताई बाबासाहेब पाटील यांनी केले.



त्या दिनांक २१ रोजी रुद्र व दाक्षायणी महिला मंडळाच्या वतीने वीरशैव मंगल कार्यालयात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील कर्तृत्वान नारींचा सन्मान सोहळ्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुद्र महिला मंडळाच्या अध्यक्षा विजयाताई चवंडा व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून सिद्धेश्वर सहकारी बँकेच्या संचालिका प्रा.डॉ.सुनिता लोहारे–चवळे, माजी नगराध्यक्षा सु–शीला चौधरी, माजी नगराध्यक्षा अश्विनी कासनाळे, विजया हामणे, स्वागताध्यक्षा संगीता अभय मिरकरले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी विविध क्षेत्रा–तील कर्तृत्वान महिलांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी उपस्थितांची मनो–गत पर भाषणे झाली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शासनाचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार विजेत्या आशा रोडगे– तत्तापूरे यांनी केले. सूत्रसंचालन सविता शेटकार यांनी तर आभार अध्यक्षा शिव–ानी चवंडा यांनी मानले.यावेळी आंतरराष्ट्रीय योग शिक्षिका वृषाली चवळे, संगीता खंडागळे, शितल मालू, सुनंदा कुलकर्णी, आशा आवाळे, आंतरराष्ट्रीय खे–ळाडू माही आरदवाड, जान्हवी जाधव, मधुरा करकनाळे, डॉ.नेहा पाटील, डॉ.वर्षा भोसले, डॉ.मयूरी चलवदे,डॉ.रुद्राणी शेटकार या कर्तत्वान नवदुर्गांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सध्या काही महिला भगिनी भारतीय संस्कृतीच्या संस्कारापासून दुर जात आहेत म्हणून दाक्षायणी महिला मंडळाच्या सदस्यांनी १६ शृंगरा बद्दल चे वैज्ञानिक व अध्यात्मिक महत्त्व सांगितले आहे.

या सोहळ्याला माजी उपनगराध्यक्ष अभय मिरकले,कपिल बिराजदार, सुनील शेटकार,प्रेमा वतनी, कलावती भातांब्रे यांच्यासह रूद्र व दाक्षायणी महिला मंडळाच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रेड रिबन क्लबची रक्त तपासणी प्रयोगशाळेस अभ्यासभेट

अहमदपूर दि.२६(कारामुंगीकर) महाविद्यालयीन वयाचे तरुण हा एड्सच्या संदर्भात सर्वात अधिक जोखमीचा घटक आहे. या दरम्यान सर्वांनी आपली वर्तणूक आदर्श ठेवायला हवी जेणेकरून एड्सची लागण होणार नाही. असे प्रतिपादन डॉ. शरद आर. गिरी वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र शिरूर ताजबंद यांनी केले.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात स्थापन करण्यात आलेल्या रेड रिबन क्लबच्या सदस्यांनी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या रक्त तपासणी प्रयोगशाळेस अभ्यास भेट दिली. पुढे डॉ. गिरी म्हणाले की महाविद्यालयीन तरुणांचे वय सजग व सावध राहण्याचे वय आहे. या दरम्यान जर तुम्ही एड्स पासून दूर राहिलात तर आयुष्य जिंकल्यासारखे आहे. या रोगापासून दूर राहण्यासाठी आपण असुरक्षित लैंगिक संबंधापासून दूर राहावे. जर आपणास ताप जरी आला असेल तरी त्यास हलक्यात घेता कामा नये. जर कोणास एड्सची लागण झालीच तर त्यात लाज बाळगण्यासारखे काही नाही तर त्यांनी दवाखान्याशी संपर्क साधून प्रॉपर ट्रीटमेंट घ्यावी, असेही ते म्हणाले.

रेड रिबन क्लबचे समन्वयक डॉ. जीवन गंगणे म्हणाले की आपल्या महाविद्यालयाच्या रेड रिबन क्लबला मोठा इतिहास लाभला आहे. हा क्लब सतत नवनवीन उपक्रम राबवत असत–ो. रक्तदानासाठी तरुणांना प्रेरित करून रक्तदान शिबिर घेतले जाते. भारत सरकारने जेव्हा रेड रिबन एक्सप्रेस भारतभर जनजागृतीसाठी प्रसारित केली होती तेव्हा आपल्या महाविद्यालयाच्या रेड रिबन क्लब सदस्यांनी लातूर रोड येथे जाऊन त्याचा लाभ घेतला आहे. रेड रिबन क्लब च्या सक्रियतेमुळे एड्स बाधितांचे प्रमाण दिवसेंदिवस घटत आहे, ही स्वागतार्ह बाब आहे. ग्रामीण रुग्णालय अहमदपूरचे श्री गणेश सूर्यवंशी, समुपदेशक श्री गणेश स्वामी, प्राचार्य डॉ. डी. जी. माने यांच्या मार्गदर्शनातून क्लब कार्य करत आहे.

प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री गाडे आर. एस. यांनी याप्रसंगी प्रयोगशाळेत वापरल्या जाणाऱ्या विविध यंत्रसामग्रीची व विविध रक्त चाचण्यांची सविस्तर माहिती रेड रिबन क्लब सदस्यांना दिली. ते म्हणाले की महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या रक्त तपासणी प्रयोगशाळा अध्यायावत तंत्रज्ञानाने युक्त आहेत. तरुणांनी वजन कमी होणे, अशक्तपणा, ताप अशी काही लक्षणं आढळताच तात्काळ तपासणी करून घ्यावी. यावेळी त्यांनी रक्तदान करताना घ्यावयाच्या खबरदारीचीही माहिती दिली.

या समारंभाचे प्रास्ताविक माहेश्वरी पांचाळ तर आभार मुस्कान शेख हिने मानले.

यावेळी आरोग्य पर्यवेक्षक श्री शिंदे एम. एस., आरोग्य कर्मचारी विवेक भंडे व विद्यार्थी लक्ष्मण मोरतळे, अझर शेख, दाभाडे योगिता, पांचाळ सोनाली, राजे पूजा व इतर विद्या–र्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कबीरवाणी

**हेरत हेरत हे सखी,**
**रहा कबीर हिराइ ।**
**बूंद समानी समुंद में,**
**सो कित हेरी जाइ ।।**

**भावार्थ** : संत कबीर म्हण–तात कि, आत्मा रुपी सखीला शोधत, शोधत संत कबीर स्वतः हरवुन गेले आहेत. यासंबंधी ते किती गहन विचार करतात, ज्याप्रमाणे विशाल समुद्रात एख–ादा थेंब पडल्यावर त्या थेंबाला शोधता येत नाही. अगदी तश्याच प्रकारे माझी सखी ही हरवुन गेली आहे. तीला मी कसे शोधु आणि तिला शोधत असताना मी स्वतः हरवुन गेलो आहे असे संत कबीर सांगतात. ज्याप्रमाणे आत्मा हा परमात्म्यामध्ये विलिन झाल्यावर स्वतःचे अस्तित्व गमावुन बसतो अगदी तश्याच प्रकारे आत्मा रुपी सखीला संत कबीर हरवुन स्वतः लाही हरवुन गेल्याचे समुद्रात थेंब पडल्यावर थेंबाचे अस्तीत्व संपते अगदी तसेच संत कबीरही हरवुन बसले आहेत.

**डॉ. बालाजी कारामुंगीकर**
**मो. ९८२३११२९०७**

# ग्रंथपालन प्रमाणपत्र प्रवेशासाठी मुदतवाढ

तुळजापुर दि.२६ (प्रतिनिधी) - महाराष्ट्र शासन ग्रंथालय संचालनालय व मराठवाडा विभाग ग्रंथालयसंघ यांच्यावतीने आयोजित तुळजापूर ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग २०२४ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे.

यासाठी जे इच्छूक प्रवेशार्थी असतील त्यांनी दि.३१ मार्चपर्यंत संपर्क साधावा असे आवाहन वर्ग व्यवस्थापक ग्रंथमित्र व.ग. सुर्यवंशी व वर्ग प्रमुख गोविंद खुरुद यांनी केले आहे. सुरेश जोशी ग्रंथपाल विजय वाचनालय तुळजापुर, ग्रंथपाल नगर वाचनालय धाराशिव, ग्रंथपाल जनता वाचनालय उमरगा, ग्रंथपाल लोक वाचनालय लोहारा, ग्रंथपाल अजिंक्य वाचनालय वाशी, ग्रंथपाल लोकमान्य वाचनालय परांडा, हनुमंत भुजबळ वाय सी कॉलेज, विनायक मस्के तुळजाभवानी महाविद्यालय तुळजापुर यांच्याशी संपर्क साधावा. यासाठी प्रवेशार्थी किमान १० वी उत्तीर्ण असावा. १० वीची गुणपत्रिका किंवा प्रमाणपत्र, टीसी, आधार कार्ड याच्या सत्यप्रती व २ फोटो आवश्यक आहेत. सार्वजनिक ग्रंथालयात काम करणाऱ्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

# निवडणूकीच्या राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करणे आवश्यक - ओंबासे

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) - लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करण्याचे निर्देश दिले आहेत. ४० - उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघासाठी धाराशिव येथे माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सचिन ओंबासे हे आहेत. निवडणूकीच्या सर्व राजकीय जाहिरातींचे पूर्व प्रमाणीकरण करणे आवश्यक असल्याचे डॉ ओंबासे यांनी सांगितले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथील जिल्हा नियोजन अधिकारी कार्यालयातील दुसऱ्या मजल्यावर असलेल्या ग्रंथालय कक्षात माध्यम कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती या कक्षात कार्यान्वीत करण्यात आली आहे. उमेदवार व राजकीय पक्षांनी आपल्या राजकीय जाहिरातीचे प्रमाणीकरण करून घेण्यासाठी आपले अर्ज दिलेल्या मुदतीत माध्यम कक्षातील माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीकडे सादर करावेत असे आवाहन डॉ ओंबासे यांनी केले. तसेच राजकीय प्रचाराच्या जाहिरातींबाबत भारत निवडणूक आयोगाने नियमावली निश्र्चित केली आहे. या नियमावलीनुसार राजकीय पक्ष व उमेदवारांना दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क एसएमएस, रेकॉर्ड केलेले व्हॉईस मेसेजेस, सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या जाहिराती तसेच मतदानाच्या दिवशी आणि त्याच्या एक दिवस अगोदर वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती या देखील माध्यम प्रमाणिकरण आणि संनियंत्रण समितीकडून (एम.सी.एम.सी.) पूर्व प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. विशेष म्हणजे जाहिरात प्रसारित होण्याच्या ४८ तास अगोदर राजकीय पक्ष, उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी जाहिरात प्रमाणीकरणासाठी जाहिरात व अर्ज सादर करावा. तर अनोंदणीकृत राजकीय पक्ष किंवा इतर व्यक्तींनी किमान सात दिवसापूर्वी समितीकडे अर्ज करणे आवश्यक आहे. माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती अर्थात एम.सी.एम.सी समिती ही अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो अर्ज ४८ तासांमध्ये निकाली काढेल. तसेच जाहिरात नियमानुसार नसल्याचे समितीला आढळून आल्यास एम.सी.एम.सी. समितीला जाहिरात प्रमाणिकरण नाकारण्याचा अधिकार आहे. समितीच्या निर्णयाविरुद्ध राज्य समितीकडे अपील करता येते. मात्र त्यानंतर केवळ सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येते. समितीने जाहिरातीत बदल सुचविल्यानंतर समितीकडून तसा संदेश प्राप्त झाल्याच्या २४ तासात राजकीय पक्ष किंवा उमेदवाराने त्यानुसार दुरुस्त्या करून नवीन निर्मित केलेली जाहिरात प्रमाणीकरणासाठी सादर करणे आवश्यक आहे. टिव्ही चॅनलद्वारे जाहिराती जर प्रसारीत करावयाच्या असतील तर अशा जाहिराती समितीकडे प्रसारणाच्या ३ दिवस अगोदर प्रमाणीकरणासाठी सादर करणे आवश्यक आहे. समिती याबाबत २ दिवसांत निर्णय देईल. जाहिरात प्रमाणीकरणासाठीचा अर्ज हा विहित नमुन्यात सादर करावा. अर्जामध्ये अर्जदाराचे नाव व पत्ता, उमेदवार किंवा पक्षाचे नाव किंवा सदर जाहिरात एखादी संस्था - ट्रस्ट- संघटना यांच्याकडून दिली जात असल्यास त्यांचे नाव, मतदारसंघाचे नाव,राजकीय पक्षाचे मुख्यालयाचा पत्ता, ज्या चॅनल, केबल नेटवर्कवर जाहिरात प्रसारित करायची आहे. त्याबाबत स्पष्ट माहिती कोणत्या उमेदवाराच्या हितासाठी सदर जाहिरात करण्यात आली आहे. त्याबाबत माहिती, जाहिरात सादर करण्यात येत असल्याचा दिनांक, जाहिरातीसाठी वापरण्यात आलेली भाषा, त्याच्या संहिता लेखनाच्या (ट्रास्कींप) साक्षांकित दोन प्रती, जाहिरातीचे शिर्षक, जाहिरात निर्मितीचा खर्च, जाहिरात जर चॅनेलव्दारे प्रसारित केली जात असेल तर किती वेळा ती प्रसारित केली जाणार आहे. त्याचे प्रस्तावित केलेले दर, त्यासाठी लागलेला एकूण खर्च आदी माहिती अर्जदाराने निवडणूक आयोगाने दिलेल्या विहित नमून्यात स्वाक्षरीसह सादर करणे आवश्यक आहे. तसेच आदर्श आचार संहितेनुसार दिलेल्या निर्देशांचे जाहिरातीमध्ये पालन होणे आवश्यक आहे. या प्रामुख्याने राष्ट्रीय एकात्मतेला हानी पोहोचविणाऱ्या बाबी, धार्मिक भावना दुखावणे, भारतीय घटनेचा अवमान करणे, गुन्हा दाखल करण्यास प्रवृत्त करणे, कायदा व सुव्यवस्थेस बाधा निर्माण करणे, गुन्हेगारीचे उदात्तीकरण, महिलांचे चुकीचे चित्रण, तंबाखूजन्य किंवा नशा आणणाऱ्या पदार्थाच्या जाहिराती, हुंडा, बालविवाह यांना उत्तेजन देणाऱ्या जाहिराती प्रसारित करण्यास प्रतिबंध असून देशावर टिका नसावी. न्यायालयाचा अवमान जाहिरातीतून होता कामा नये. राष्ट्रपती व न्याय संस्था यांच्याबाबत साशंकता नसावी. राष्ट्रीय एकात्मतेला, सौहार्दतेला आणि एकतेला बाधा पोहचविणारा मजकूर त्यामध्ये नसावा. सुरक्षा दलातील कोणतेही सैनिक, व्यक्ती, अधिकारी यांची अथवा सैन्य दलाचे छायाचित्र जाहिरातीत नसावे. तसेच कोणत्याही व्यक्तीच्या खाजगी, वैयक्तिक जीवनातील घटनांना धरुन त्यावर भाष्य नसावे. व्हिडीओ व्हॅनद्वारे प्रचारासाठी उपयोगात आणले जाणारे साहित्य याचे माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समितीकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे.या वाहनाची निवडणूक विभागाकडून रितसर परवानगी घेणे आवश्यक आहे. तर एखाद्या व्यक्तीला उमेदवार किंवा राजकीय पक्ष यांच्या संमतीशिवाय प्रचार करणाऱ्या जाहिराती देता येणार नाहीत. अनुमतीशिवाय जाहिराती प्रकाशित झाल्यास प्रकाशकावर गुन्हा दाखल करण्यात येईल. मतदानाच्या दिवशी व मतदानाच्या एक दिवस अगोदर मुद्रीत माध्यमाद्वारे प्रकाशित करावयाची जाहिरात प्रमाणीकरणसाठी समितीकडे २ दिवस आधी जाहिरातीसह अर्ज सादर करणे आवश्यक राहणार असल्याचे डॉ ओंबासे यांनी सांगितले आहे.

# गोमांस विक्रीसाठी घेऊन जाणारा टेम्पो पकडला

## परंडा पोलिसांची धडक यशस्वी मोहीम



परंडा दि.२६ (प्रतिनिधी) - परंडा येथे गोवंशीय जनावरांची कत्तल करून त्याची विक्री करण्यासाठी नेणाऱ्या वाहनास रंगेहात पकडून संबंधित आरोपींना जेरबंद केले आहे. तर गोमासासह ८ लाख ८६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही दमदार व यशस्वी कामगिरी परंडा पोलिसांनी दि.२५ मार्च केली आहे.

परंडा शहरात व परिसरात गोवंश जनावरांची अवैध कत्तल करणार्यांवरुद्ध परंडा पोलीसांनी मोहीम हाती घेतली आहे. यापूर्वी परंडा पोलीसांच्या पुढाकारातून परंडा येथील अवैध कत्तलखाने जमीनदोस्त करण्यात आले होते. तथापि, चोरून लपून गोवंश जनावरांची कत्तल होत असल्यास त्याबाबत गोपनीय माहिती मिळविण्याकरीता गोपनीय यंत्रणा सक्रिय करण्यात आलेली आहे. याचाच एक भाग म्हणून दि.२५ मार्च रोजी भल्या पहाटे परंडा पोलिसांना प्राप्त गोपनीय माहितीनुसार गोमांसाची वाहतूक करणाऱ्या वाहनास पकडण्यात यश आले आहे. जुने तहसील कार्यालयासमोर सापळा रचून गोमांसाची वाहतूक करणारे वाहन पकडण्यात आले. सदरील वाहनावर वाहन क्रमांक चक-४२ इक्र - २६६० नमूद आहे. वाहन चालक इम्रान मशीर शेख याला ताब्यात घेण्यात आले आहे. वाहनचालकाकडे आणखी सखोल चौकशी केली असता त्याने सांगितलं की तो स्वतः भिगवन येथील रहिवासी असून आजूबाजूच्या परिसरातून जिवंत जनावरे विकत घेतली जातात आणि त्यानंतर ती जनावर परंडा येथे आणली जातात. परंडा येथे आल्यावर शाहबाज अजीज सौदागर यांच्या अवैध कत्तलखान्यावर त्या जनावरांची कत्तल केली जाते. चौकशीमध्ये आतापर्यंत दोन आरोपी निष्पन्न झालेले आहेत. सर्व आरोपीविरुद्ध गु.र.नं. ६६/२४ अन्वये कलम ४२९ भा.द.वि. सह कलम ५ (सी), ९ (ए) महाराष्ट्र प्राणि संरक्षण अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला असून या गुन्ह्यात वाहन आणि गोमांस असा एकूण ८ लाख ८६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किरण घोंगडे हे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक गोहर हसन, भूम उपविभागीय पोलीस अधिकारी गौरीप्रसाद हिरेमठ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद इज्जतपवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक कविता मुसळे, पोलीस उपनिरीक्षक किरण घोंगडे, महिला पोलीस हवालदार पायाळे, पोलीस हवालदार फिरोज शेख, नाईक पोलीस अंमलदार नितीन गुंडाळे, पोलीस अंमलदार श्रीकांत गायकवाड, पोलीस अंमलदार जगदाळे पोलीस अंमलदार डिकोळे यांनी यशस्विरित्या पूर्ण केली आहे.



# सख्या छोट्या बहिणींनी धरले रोजा उपवास

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) - शहरातील खडखपुरा येथील मुजफ्फर शेख (वय - ४ वर्षे) व मधीहा मुजफ्फर शेख (वय- ६ वर्षे) या दोघी बहिणींनी अशा कडक उन्हाळ्यामध्ये पवित्र रमजान महिन्याचा जिवनातील पहिला उपवास दि.२५ मार्च रोजी ठेवला होता.

# दिव्यांगांना लघु उद्योगाच्या नाविन्यपूर्ण संधी




पनवेल/ प्रतिनिधी - डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा नवीन पनवेल येथे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ श्रेया जाधव यांच्या संकल्पनेतून सस्टेनेबल व इको फ्रेंडली पेपर ज्वेलरी बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. वजनाने हलक्या व नाविन्यपूर्ण अशा दीर्घा क्रिएशनच्या दागिन्यांना खूप मागणी आहे.

श्रीमती प्राजक्ता दळवी (दीर्घा क्रिएशन )यांनी विद्यार्थ्यांना बनवता येतील अशा सोप्या व वैविध्यपूर्ण ज्वेलरी बनविण्याचे प्रशिक्षण दिले . नवीन कलाप्रकार शिकण्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या कलागुणांच्या आधारे व्यवसायाच्या नवीन संधीचे दालन खुले झाले. अशा प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्याच्या नव्या वाटा मिळतील अशी प्रतिक्रिया समाजातून येत आहे. शाळेच्या या कार्याचे पालक व शाळेचे हितचिंतक यांच्याकडून कौतुक होत आहे.

# तेरणा महाविद्यालयात जागतिक जल दिवस साजरा




धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) - तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात जागतिक जल दिवस विविध उपक्रमांनी दि.२२ मार्च रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिनस्त महाविद्यालयामध्ये युवकाच्यावतीने नैसर्गिक संसाधनाचे व पाण्याची बचत हे अभियान राबविले जात आहे. त्यानुसार तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय धाराशिव येथे जागतिक जल दिवस साजरा करण्यात आला. या अभियानांतर्गत महाविद्यालयात ग्रीन क्लब स्थापन करून विविध उपक्रम राबवण्यात आले. या उपक्रमाला महाविद्यालयातील विविध शाखेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने होते. राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमामध्ये पोस्टर प्रेसेंटेशन, जनजागृती पथनाट्य, भाषण स्पर्धा, बर्ड वॉटर फीडर, वॉटर ड्रिपिंग किट व जल जागरूकता कार्यक्रम असे उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमातून विद्यार्थ्यांकडून नाविन्यपूर्ण कल्पनांचे रूपांतर अद्ययावत तंत्रज्ञान उपयोग करून प्रकल्प तयार करण्यात येणार आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल, सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स टेलीकम्युनिकेशन कॉम्प्युटर आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डाटा सायन्स या शाखेतील १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी उच्च व तंत्र शिक्षण महाराष्ट्र शासन व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सेल्फ प्लेस्ड (स्वयंगती) कोर्स पूर्ण केला अशी माहीत कार्यक्रमाचे समन्वयक व जी.सी.एफ.सी. प्रा.अभिजीत कदम यांनी दिली. महाविद्यालयात राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांची जबाबदारी डॉ.एस.एन. होळंबे, प्रा.व्ही.सी. मैंदर्गी, प्रा ए.के. पिंपळे, प्रा.आर.म. शेख ,प्रा. डी.डी. मुंडे व प्रा. के.जी. डोलारे यांनी यशस्विरित्या पूर्ण केली.

# केंद्रीय मंत्री राणे यांनी घेतले तुळजाभवानीचे दर्शन

तुळजापुर दि.२६ (प्रतिनिधी) - केंद्रीय मंत्री नारायण

राणे यांनी कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेचे कुटुंबियांसह दि.२५ मार्च रोजी दर्शन घेतले. यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा जैन प्रकोष्ट लोकसभा समन्वयक गुलचंद व्यवहारे, प्र. का. सदस्य विनोद गपाट, तुळजापुर बाजार समितीचे सभापती सचिन पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजसिंह राजेनिंबाळकर, भाजप तालुकाध्यक्ष संतोष बोबडे, शहराध्यक्ष शांताराम पेंदे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आनंद कंदले, अमर हंगेरगेकर, राम चोपदार, सागर पारडे यांनी स्वागत केले.

# फायनान्स कंपनीने ट्रॅक्टर नावावर करुन न देता ८ लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक केली

धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) - ट्रॅक्टर, डंपीग ट्रॉली व नांगर फायनान्स कंपनीने शेतकऱ्याला विकला. परंतू तो संबंधिताच्या नावे करून न देता फायनान्स कंपनीच्याच नावे ठेवला. त्यामुळे त्या शेतकऱ्यांची ८ लाख रुपयांची फसवणूक झाली असून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, भूम तालुक्यातील ज्योतीबाचीवाडी येथील दत्ता परसु पवार (वय ३४ वर्षे) यांनी बीड जिल्ह्यातील आडेगाव येथील गहीनीनाथ सुखदेव देवडीकर (वय ४२ वर्षे) तर खुंडूस येथील रामभाऊ ई. हातवाटे (वय ३६ वर्षे) गुंडेवाडी येथील कल्याण आश्रुबा चन्ने (वय ४१ वर्षे) व पुणे शिवाजी नगर तर्फे

मे श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स को.लि. शाखा व्यवस्थापक पहिला मजला साई पॅलेस हॉटेल समोर बीड यांचे दि. १७ फेब्रुवारी २०२२ रोजी ते दि. १२ डिसेंबर २०२२ व आजपर्यंत जनहितम मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी बॅक शाख ई ता. भूम व बीड व आर टी ओ ऑफीस बीड येथे आरोपी गहिनीनाथ देवडीकर, रामभाऊ हातवाटे यांच्याकडून ट्रॅक्टर, डंपीग, ट्रॉली व नांगर हे ६ लाख ९० हजार रुपयांना खरेदी केले. हा वाहन खरेदीचा करारनामा बीड येथील ॲड नोटरी केकान यांच्याकडे रजि. नं १४०/२२ अन्वये नोंदवून देवून आरटीओ एनओसीच्या नावाने जादा २ लाख रुपये हात उसने घेवून त्या बदल्यात बॅकेचा चेक दिला. परंतू तो चेक न वटल्यामुळे फिर्यादीची फसवणुक केली. तसेच तो ट्रॅक्टर परस्पर विक्री करुन त्यावर मे श्रीराम ट्रान्सपोर्ट फायनान्स को. लि. शिवाजीनगर पुणे तर्फे शाखा व्यवस्थापक साई पॅलेस हॉटेल समोर बीड यांचे लोन घेवून आजपर्यंत फिर्यादीच्या नावावर करुन न देता ८ लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी दत्ता पवार यांनी दि.२४ मार्च रोजी दिलेल्या तक्रारीवरून वाशी पोलीस ठाण्यात ४०६, ४०९, ४१८, ४२०, ४६३, ४६४, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# मोहेकर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन ऑनलाईन कार्यशाळा

कळंब दि.२६ (प्रतिनिधी) - येथील शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन दि.२२ मार्च रोजी करण्यात आले होते.

ही कार्यशाळा प्राणीशास्त्र पदव्युत्तर विभाग व आय एफ ए एस एडुटेक इन्स्टिट्यूट पुणे यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित केलेली होती. या कार्यशाळेमध्ये ऑनलाईन व ऑफलाईन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुनील पवार, कार्यशाळेचे प्रास्ताविक समन्वयक डॉ एच.के. भगवान यांनी केले. कार्यशाळेचे व्याख्याते प्रान्स दिवेदी यांनी विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रातील नोकरीच्या संधी वैज्ञानिक क्षेत्रात, औद्योगिक क्षेत्रात, फार्मासिटिकल बायोकेमिकल, पेट्रोकेमिकल यासाठी असणाऱ्या वेगवेगळ्या परीक्षा. तसेच प्राणीशास्त्र विभागातून पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर परदेशात संशोधनासाठी असणाऱ्या संधी या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले. ऑर्गनायझिंग सेक्रेटरी डॉ. जयवंत ढोले यांनी आभार मानले. कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील प्रा ज्ञानेश चिंते, प्रा. दीपक वाळके, डॉ.पल्लवी उंद्रे, डॉ. विश्र्वजित मस्के, डॉ. हेमंत चांदोरे, डॉ. सुरेश वेदपाठक, डॉ. सुशील जमाले, प्रा. दीपक सुर्यवंशी यांनी उपस्थिती नोंदवली. या कार्यशाळेसाठी तांत्रिक काम अरविंद शिंदे यांनी पाहिले. या कार्यक्रमाला अभिमन्यू हाके, साजिद शेख, अजय भावे, चांगदेव खंदारे यांनी परिश्रम घेतले.

# धाराशिव पोलिसांच्या शिरपेचात खो-खो महिला खेळाडूने रोवला मानाचा तुरा



धाराशिव दि.२६ (प्रतिनिधी) - पोलीस अधीक्षक कार्यालयात नेमणुकीस असलेल्या पोलीस हेडकॉन्स्टेबल संगीता चव्हाण-पवार यांची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामुळे चव्हाण-पवार यांच्या माध्यमातून धाराशिव पोलिसांच्या शिरपेचामध्ये मानाचा तुरा खोवला आहे.

संगीता चव्हाण-पवार या खो-खो राष्ट्रीय खेळाडू असून त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये धाराशिवचे व धाराशिव पोलीस दलाचे प्रतिनिधित्व केले आहे. तर दिल्ली येथे दि.२८ मार्च ते २ एप्रिल दरम्यान दिल्ली येथे होणाऱ्या खो-खो स्पर्धे साठी त्यांची खो-खो महिला महाराष्ट्र संघामध्ये निवड झाली आहे. या निवडीबद्दल पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी व अप्पर पोलीस अधीक्षक हसन गौर यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. तर पोलिस अंमलदार पतसंस्थेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी धाराशिव पोलीस पतसंस्थेचे चेअरमन गोविंद पवार, व्हाईस चेअरमन गीतांजली फुलसुंदर, सचिव महेशकुमार कचरे, संचालक किरण डोके, शिवाजी गवळी, योगेश सुर्यवंशी, तसेच संगीता चव्हाण - पवार यांच्या वर्ग मैत्रीण शैला टेळे, रंजना टोंपे - होळकर आदी उपस्थित होते.

# डॉ आंबेडकर जयंती समितीच्या अध्यक्षपदी बनसोडे

परंडा दि.२६ (प्रतिनिधी) - येथील आर बी ग्रुप व नालंदा समूहाच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीच्या अध्यक्षपदी रुपेश बनसोडे यांची तर कोषाध्यक्षपदी सिद्धांत वाघमारे यांची एकमताने निवड करण्यात आली.

राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचेसं सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी नगरसेवक राहुल बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत उपाध्यक्ष प्रतिक बनसोडे, प्रकाश बनसोडे, अविनाश बनसोडे, हर्षवर्धन पाटील यांची तर सचिवपदी अक्षय बनसोडे, अभिजित बनसोडे, ऋषीकेश बनसोडे, रणजित नागटिळक, अभिजित कांबळे यांची तसेच सरचिटणीसपदी गणेश मदने, ओंकार कुंभारे, अनिकेत गोंजारे, सुरज बनसोडे, विजय दनाने, वैभव ओहाळ यांची तर संघटकपदी महेंद्र बनसोडे, हनुमंत सोनवणे, संजय बनसोडे, भाऊ साळवे, लक्ष्मण शिंदे, दत्तात्रय बनसोडे, कृष्णा चौधरी, दत्तात्रय डाके यांची तसेच मार्गदर्शक म्हणून घनश्याम शिंदे, जीवन बनसोडे, सिध्दार्थ बनसोडे, सागर बनसोडे, गनी हावरे, कय्युंम तुटके, प्रकाश शिंदे, गोपाळ अलबत्ते यांची तसेच कार्यकारिणी सदस्यपदी अभिजित शिंदे, नितिन बनसोडे, प्रशांत मदने, समाधान लोंढे, राहुल बसवंत, पंकज बनसोडे, सोहम बनसोडे, यश शिंदे, अतिश बनसोडे, रोहित कांबळे, सुमित बनसोडे, आरिफ शेख, सुजित कांबळे, लालासाहेब नगरे, ओम चव्हाण, सुरज चौधरी, अल्ताफ शेख, प्रथमेश लोकरे, साहिल लोखंडे यांची निवड करण्यात आली आहे.

# संपादकीय



अनुवंशिकतेच्या नियमांचा प्रथम शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणाऱ्या ग्रेगॉर योहान मेंडेल या शास्त्रज्ञाचा जन्म इ.स. १८१० मध्ये झाला. झेकोस्लोव्हाकिया देशातील मोराव्हिया परगाण्यात मेंडेलचे वडील थोडी शेती व फावल्या वेळात बागकाम करीत असत. छोटा ग्रेगॉर योहान लहानपणापासूनच आपल्या वडिलांना बागकामात मदत करीत असे व बागेतील झाडे, फुले, फळे यांच्याविषयी अनेक प्रश्न विचारीत असे.

कुटुंबाची गरिबीची परिस्थिती असूनही ग्रेगॉर योहानने कॉलेज शिक्षण पूर्ण केले. त्याचे लहानणाचे नाव योहानच होते, पण विसाव्या वर्षी त्याने धार्मिक वृत्ती संपादन करून चर्चमध्ये प्रवेश केला आणि सेंट ग्रेगॉरी या धर्मगुरूच्या स्मरणार्थ ग्रेगॉर हे नाव धारण केले. धार्मिक विषयाबरोबरच त्याने वनस्पतिशास्त्राचाही अभ्यास सुरू ठेवला. ग्रेगॉरच्या संशोधनात्मक कामास प्रोत्साहन म्हणून चर्चच्या अधिकाऱ्यांनी त्याला व्हेनिसच्या विश्वविद्यालयामध्ये पुढील शिक्षणासाठी पाठविले. पुढे आल्टब्रून येथील शिक्षणसंस्थेत प्राध्यापक म्हणून त्याची नेमणूक झाली. अध्यापन आणि संशोधनात प्रगती साधता साधता चर्चच्या बागेची मशागत तो शास्त्रशुद्ध पद्धतीने करी.

उंच मटारांमधील सोनेरी 'पोलन' ठेंगू मटाराच्या बियाणाबरोबरच लावल्यास सर्व मटार उंच उगवतात हा मेंडेलने पहिला शोध लावला. म्हणजे उंच मटाराच्या पोलनमध्ये उंच मटार निर्मिण्याचे सामर्थ्य आहे हे समजले. या मटाराची दुसरी पिढी सर्वच काही उंच निपजली नाही. तीन उंच मटारामागे एक ठेंगू मटार उगवला. यावरून पहिल्या पिढीत पित्याच्या सामर्थ्यामुळे सर्व प्रजा उंच झाली, तर दुसऱ्या पिढीत 'आजी'च्या गुणधर्मामुळे तिसरा हिस्सा प्रजा ठेंगू निर्माण झाली असा मेंडेलने निष्कर्ष काढला व शास्त्रज्ञांच्या सभांतून त्याने काही व्याख्याने दिली.

मेंडेलने अनुवंशिकतेचे नियम पुढीलप्रमाणे मांडले. १) मटारांच्या वाढीच्या निरीक्षणाप्रमाणे, विशिष्ट उदा. बियांचा रंग, झाडांची उंची-आकार हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येतात, नष्ट होत नाहीत. २) दोन परस्परविरोधी गुणधर्मांच्या संयोगामुळे जी प्रजा निर्माण होते, ती दोन्ही प्रकारचे गुणधर्म घेते. या गुणधर्मांपैकी एक प्रभावी असतो तर दुसरा निर्बळ असतो. ३) तिसऱ्या पिढीमध्ये प्रभावी व निर्बल गुणधर्माचे पृथक्करण होते व त्यांचे प्रमाण ३:१ असे असते.

मेंडेलच्या मृत्यूनंतर सोळा वर्षांनी त्याच्या संशोधनाचे महत्त्व जगाला कळले. १८७० मध्ये प्रकाशित झालेल्या मेंडेलच्या प्रबंधांची इ.स. १९०० साली तीन युरोपियन शास्त्रज्ञांना आठवण झाली. तीस वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या मेंडेलच्या अनुवंशिकतेच्या तत्त्वात खूप सत्य भरलेले आहे हे सर्व शास्त्रज्ञांना ज्ञात झाले. प्राणी व मानव हे सुद्धा मेंडेलच्या या तत्त्वाप्रमाणे गुणप्रदान करतात त्याचे प्रत्यंतर शास्त्रज्ञांना आले. भरघोस पीक कसे घ्यावे, जनावरांची जोपासना, रोगनिर्मूलन इत्यादीसाठी मेंडेलियन तत्त्वांचा उपयोग होत आहे.

**ज्यांच्या शोधामुळे जगाची जगण्याची दिशा बदलली असे जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ यांची नवीन अभ्यासू पिढीला माहिती व्हावी व त्याद्वारे प्रेरणा मिळावी या हेतूने संक्षिप्त स्वरुपात दरदिवशी किंवा सोईप्रमाणे एका शास्त्रज्ञांची माहिती आम्ही प्रकाशित करीत आहोत. यासंदर्भात आपली प्रतिक्रिया आपेक्षित आहे.**

– संपादक **यशवंत** लातूर

## ग्रेगॉर योहान मेंडेल ५३



अनुवंशिकतेच्या नियमांचा प्रथम शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणाऱ्या ग्रेगॉर योहान मेंडेल या शास्त्रज्ञाचा जन्म इ.स. १८१० मध्ये झाला. झेकोस्लोव्हाकिया देशातील मोराव्हिया परगाण्यात मेंडेलचे वडील थोडी शेती व फावल्या वेळात बागकाम करीत असत. छोटा ग्रेगॉर योहान लहानपणापासूनच आपल्या वडिलांना बागकामात मदत करीत असे व बागेतील झाडे, फुले, फळे यांच्याविषयी अनेक प्रश्न विचारीत असे.

कुटुंबाची गरिबीची परिस्थिती असूनही ग्रेगॉर योहानने कॉलेज शिक्षण पूर्ण केले. त्याचे लहनणाचे नाव योहानच होते, पण विसाव्या वर्षी त्याने धार्मिक वृत्ती संपादन करून चर्चमध्ये प्रवेश केला आणि सेंट ग्रेगॉरी या धर्मगुरूच्या स्मरणार्थ ग्रेगॉर हे नाव धारण केले. धार्मिक विषयाबरोबरच त्याने वनस्पतिशास्त्राचाही अभ्यास सुरू ठेवला. ग्रेगॉरच्या संशोधनात्मक कामास प्रोत्साहन म्हणून चर्चच्या अधिकाऱ्यांनी त्याला व्हेनिसच्या विश्वविद्यालयामध्ये पुढील शिक्षणासाठी पाठविले. पुढे आल्टब्रून येथील शिक्षणसंस्थेत प्राध्यापक म्हणून त्याची नेमणूक झाली. अध्यापन आणि संशोधनात प्रगती साधता साधता चर्चच्या बागेची मशागत तो शास्त्रशुद्ध पद्धतीने करी.

उंच मटारांमधील सोनेरी 'पोलन' ठेंगू मटाराच्या बियाणाबरोबरच लावल्यास सर्व मटार उंच उगवतात हा मेंडेलने पहिला शोध लावला. म्हणजे उंच मटाराच्या पोलनमध्ये उंच मटार निर्मिण्याचे सामर्थ्य आहे हे समजले. या मटाराची दुसरी पिढी सर्वच काही उंच निपजली नाही. तीन उंच मटारामागे एक ठेंगू मटार उगवला. यावरून पहिल्या पिढीत पित्याच्या सामर्थ्यामुळे सर्व प्रजा उंच झाली, तर दुसऱ्या पिढीत 'आजी'च्या गुणधर्मामुळे तिसरा हिस्सा प्रजा ठेंगू निर्माण झाली असा मेंडेलने निष्कर्ष काढला व शास्त्रज्ञांच्या सभांतून त्याने काही व्याख्याने दिली.
मेंडेलने अनुवंशिकतेचे नियम पुढीलप्रमाणे मांडले. १) मटारांच्या वाढीच्या निरीक्षणाप्रमाणे, विशिष्ट उदा. बियांचा रंग, झाडांची उंची-आकार हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे येतात, नष्ट होत नाहीत. २) दोन परस्परविरोधी गुणधर्मांच्या संयोगामुळे जी प्रजा निर्माण होते, ती दोन्ही प्रकारचे गुणधर्म घेते. या गुणधर्मांपैकी एक प्रभावी असतो तर दुसरा निर्बळ असतो. ३) तिसऱ्या पिढीमध्ये प्रभावी व निर्बल गुणधर्माचे पृथक्करण होते व त्यांचे प्रमाण ३:१ असे असते.
मेंडेलच्या मृत्यूनंतर सोळा वर्षांनी त्याच्या संशोधनाचे महत्त्व जगाला कळले. १८७० मध्ये प्रकाशित झालेल्या मेंडेलच्या प्रबंधांची इ.स. १९०० साली तीन युरोपियन शास्त्रज्ञांना आठवण झाली. तीस वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या मेंडेलच्या अनुवंशिकतेच्या तत्त्वात खूप सत्य भरलेले आहे हे सर्व शास्त्रज्ञांना ज्ञात झाले. प्राणी व मानव हे सुद्धा मेंडेलच्या या तत्त्वाप्रमाणे गुणप्रदान करतात त्याचे प्रत्यंतर शास्त्रज्ञांना आले. भरघोस पीक कसे घ्यावे, जनावरांची जोपासना, रोगनिर्मूलन इत्यादीसाठी मेंडेलियन तत्त्वांचा उपयोग होत आहे.

# सेमी कंडक्टर निर्मिती उद्योग जोशात



पंतप्रधानांनी अलीकडेच व्हिडियो कॉन्फरन्सिंगद्वारे १.२६ लाख कोटी खर्चाच्या तीन नव्या सेमीकंडक्टर प्रकल्पांची पायाभरणी केली. यापैकी दोन प्रकल्प टाटा समूहाचे तर एक सीजी पॉवर कंपनीचा आहे.

सेमीकंडक्टरच्या उत्पादनात तैवान, दक्षिण कोरिया, जपान आणि अमेरिका हे चीनसमोर उभे ठाकले असले, तरी निर्यातीच्या बाबतीत चीन पहिल्या स्थानी आहे. कोविडकाळात चीनची निर्यात खूप घटल्याने सेमीकंडक्टरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला होता आणि इलेक्ट्रिक गाड्या, टेलिकॉम, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल आणि संरक्षण या क्षेत्रांना खूप झळ लागली होती. बऱ्याच नवीन मोटारगाड्यांसाठी ग्राहकांना सुमारे वर्षभराच्या प्रतीक्षाकाळाला सामोरे जावे लागले. संरक्षणक्षेत्रात तर अशी परावलंबिता कुठल्याही देशाला परवडणारी नसते. आता सरकारने या अतिमहत्त्वाच्या उत्पादनात स्वयंपूर्ण होण्यासाठी तातडीची पावले उचलत या घोषणेच्या आधीही फॉक्सकॉनसारख्या विदेशी कंपन्यांनी भारतात सेमीकंडक्टरच्या उत्पादनाची घोषणा केली आहे. भारतीय कंपन्यांची आणि अर्थव्यवस्थेची सुदृढ स्थिती, विदेशी गुंतवणुकीचा वाढता ओघ आणि सकारात्मक सरकारी धोरणे लक्षात घेता भारतीय शेअर बाजार येत्या दोन वर्षांच्या काळात वाढतच जाणार आहे. हा अमृतकाळ गुंतवणूकदारांनी कुठल्याही परिस्थितीत चुकवता कामा नये. एकूण सर्व घटना लक्षात घेता शेअर बाजारातील सध्याची घसरण ही मूलभूत कारणांमुळे झाली नसून फार जास्त वाढलेल्या बाजार मूल्यांकनामुळे आहे आणि त्यात बऱ्याच दिवसांपासून अपेक्षित असलेली ही दुरुस्ती आता बघायला मिळते आहे, असे म्हणायला हरकत नाही.यातून काही मूलभूतरीत्या मजबूत कंपन्यांचे समभाग आकर्षक भावात उपलब्ध होऊ शकतात. गुंतवणूकदारांनी अशा कंपन्यांवर लक्ष ठेवायला हवे.




# तुम्हीही एकाच जागी खूप काळ गाडी लावून ठेवत असाल तर होऊ शकते मोठे नुकसान,घ्या जाणून

तुम्ही तुमची कार किंवा गाडी एकाच जागी लावत असाल तर ही बातमी तुमच्याकरता उपयुक्त आहे. खरं तर, कार एका जागी जास्त वेळ उभी राहिल्यास तुमच्या खिशाला भारी पडू शकते, आम्ही असे म्हणत आहोत कारण जास्त वेळ पार्किंग केल्यामुळे तुमच्या कारचे टायर आणि इतर भाग देखील पूर्णपणे खराब होऊ शकतात. तुम्हालाही तुमचे वाहन अनेक दिवस एकाच ठिकाणी पार्क करावे लागत असेल, तर आज आम्ही तुम्हाला काही टिप्स सांगणार आहोत, ज्याचे पालन करून तुम्ही मोठे नुकसान टाळू शकता.

१. वाहन बराच वेळ एकाच जागी उभे राहिल्यास बॅटरी डिस्चार्ज होते. तसेच बॅटरीची क्षमता झपाट्याने कमी होऊ लागते. हे टाळण्यासाठी, किमान १० दिवसांतून एकदा वाहन सुरू करा ज्यामुळे बॅटरी आणि इंजिन दोन्ही चांगले टिकेल.

२. वाहन एकाच ठिकाणी जास्त वेळ उभे राहिल्यास त्याचे टायर खराब होते. हे टाळण्यासाठी किमान १५ दिवसात वाहन बाहेर घेऊन जा. यामुळे गाडीचे ब्रेक, क्लच, बॅटरी आणि इंजिन खराब होणार नाही. ३. कारच्या इंजिनच्या भागांची जेवढी काळजी घ्यावी, तेवढीच त्याच्या बाह्य भागाचीही देखभाल केली पाहिजे. तुमच्याकडे कोणत्याही कंपनीची कोणतीही कार असली, जेथे लोखंड आहे, तेथे नेहमी गंज लागण्याची शक्यता असते.

४. वाहन बराच वेळ उभे असले तरीही इंधन टाकी भरलेली ठेवा. तसेच, जर तुम्हाला कधी आपत्कालीन परिस्थितीत वाहनाची गरज भासली तर तुमच्या वाहनात पुरेसे इंधन असेल.


५. तुमची कार नेहमी चांगल्या स्थितीत ठेवण्यासाठी, एका गोष्टीकडे विशेष लक्ष द्या की कार जास्त काळ उभी राहू नये. असे केल्याने, कारचे पार्टर्स, टायर्स, इंजिन, बॅटरी इत्यादी गोष्टी जॅम होऊ लागतात आणि त्यांच्यामधला गुळगुळीतपणा संपू लागतो. ज्यामुळे कार लवकर जुनी होते. काही वेळा वाहनांच्या पेट्रोलच्या टाक्याही सुकतात. यामुळे त्याचा देखभाल खर्च वाढतो. हे सर्व टाळण्यासाठी, जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा कार थोडी चालवा जेणेकरून त्याचे भाग नेहमी फिट राहतील. तसेच, हे लक्षात ठेवा की जर तुम्ही बराच काळ बाहेर कुठेतरी जात असाल, तर घराच्या बाहेर मोकळ्या जागेत कार उभी करू नका, त्यामुळे गाडी लवकर खराब होईल.

# दात किडणे, हिरड्यांना सूज येणे बेतेल जीवावर, ७५ टक्क्यांपर्यंत वाढते

आरोग्याच्या दृष्टीने दातांची स्वच्छता खूप महत्त्वाची आहे. आजकाल दात स्वच्छ करण्यासाठी बाजारात अनेक उत्पादने आहेत. दातांची स्वच्छता करण्यासोबतच त्यांची रोज काळजी घेतली पाहिजे, असे आरोग्य तज्ज्ञांचे मत आहे. दात नियमित साफ न केल्यास प्लाक जमा होतो. प्लाक हा एक चिकट थर असतो, जो दातांना चिकटतो आणि हळूहळू दात किडतो. नुकत्याच झालेल्या एका संशोधनात असे आढळून आले आहे की तोंडाच्या स्वच्छतेमुळे यकृताच्या कर्करोगासारखा जीवघेणा आजार होऊ शकतो.

खराब धीरत परटू हे यकृताच्या कर्करोगाचे कारण ...

क्वीन्स युनिव्हर्सिटी बेलफास्ट येथे केलेल्या अभ्यासानुसार , किडलेले दात आणि तोडाच्या अस्वच्छेतमुळे यकृताचा कर्करोग (थ्ग्नी ण्रहमी ाग्ज्ञ) होऊ शकतो. अभ्यास करणाऱ्या संशोधकांना असे आढळून आले की ज्या लोकांना तोंडाचे आजार जसे की हिरड्यांमधून रक्त येणे, तोंडात व्रण येणे, दात किडणे किंवा आघात होणे यांसारखे आजार होते त्यांना हेपॅटोसेल्युलर कार्सिनोमाचा धोका ७५ टक्के जास्त असतो. हे यकृताच्या कर्करोगासाठी ते धोकादायक आहे.



संशोधनात झाला मोठा खुलासा

या अभ्यासात ब्रिटनमधील ४.५ लाखांहून अधिक लोकांची निवड करण्यात आली होती. त्यांच्या दातांचा आणि तोंडाचा अभ्यास करण्यात आला. त्यानंतर तोंडाचे आरोग्य आणि गॅस्ट्रोइंटेस्टाइनल कर्करोगाच्या जोखमीचे विषण करण्यात आले. संशोधकांना असे आढळून आले की, संशोधनात सहभागी असलेल्या ४,०६९ लोकांना ६ वर्षांमध्ये गॅस्ट्रोइंटेस्टाइनल कर्करोग झाला. यापैकी १३ टक्के प्रकरणांमध्ये, रुग्णांमध्ये ज्ददी दीरत प्ब्ुगहा आढळून आले.

तज्ज्ञ काय म्हणतात?

तोंडाच्या आरोग्यामुळे यकृताच्या कर्करोगाचा धोका कसा वाढतो हा प्रश्न अनेकांच्या मनात येतो. यामागे दोन कारणे असू शकतात, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पहिल्या कर्करोगात तोंडी आणि आतड्याच्या मायक्रोबायोमची भूमिका. दुसरीकडे, ज्यांच्या तोंडाचे ज्ददी दीरत प्ब्ुगहा आढळून आहे. ते पौष्टिक पदार्थ खाण्यास असमर्थ आहेत. त्यामुळे त्यांच्या यकृताच्या कर्करोगाचा धोका वाढतो. यकृताच्या कर्करोगामुळे वजन कमी होणे, कावीळ, वेदना किंवा ओटीपोटात सूज येऊ शकते. तुम्हाला या समस्या असल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# राशी भविष्य

२७ मार्च २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
समाजात आपल्या कामाची स्तुती होईल. धार्मिक कामाकडील ओढा वाढेल. ओळखीचा फायदा होईल. घर, जमीन विकत घेण्याचा योग आहे. डोळ्याचा आजार संभावतो.

वृषभ : शुभ रंग:लाल,शुभ दिशा:उत्तर
शुभ कार्याला सुरूवात करण्याचे योग आहेत. मनस्थिती चंचल होऊ देऊ नका. आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका. वाईट व्यसनांपासून दूर रहा. प्रवास टाळा. मिथुन : शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व
महत्वाची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. एकद्या व्यक्तीच्या सहवासामुळे आपल्या जीवनात बदल घडून येईल. जीवनसाथी बरोबर प्रेमळपणे वागा.

कर्क : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण
फायदेशीर प्रेरणा मिळणार आहे. शुभ कार्यात सामील होण्याचा योग आहे. आर्थिक खर्च वाढणार आहे. व्यापार व्यवसाय चांगला चालेल.

सिंह : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:उत्तर
मित्रांच्या सहकार्याने फायदा होईल. स्थावर प्रकरणाचा निकाल आपल्या बाजूने राहील. संत लोकांचा सहवास लाभेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

कन्या : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर
कामामध्ये यश न मिळाल्याने निराशा येईल. कोणाच्याही मदतीची अपेक्षा करू नका. नवीन संधी मिळणार नाही. कौटुंबीक वातावरण सामन्य राहील.

तुळ : शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व
मान सन्मान वाढणार आहे. कार्यात येणारे विघ्न दूर होतील. बाहेरच्या लोकांमुळे फायदा होईल. जोखमीचे कामे करू नका.

वृश्चिक : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: उत्तर
अचानक यश मिळाल्याने मन प्रसन्न राहील. कौटुंबिक समस्या हल होतील. आपल्या वाईट व्यसनांपासून दूर रहा.अनावश्यक खरेदी होईल.

धनु : शुभ रंग:निळा,शुभ दिशा:दक्षिण
आपण केलेल्या कार्यामुळे स्वत:ला फायदा होईलच त्या बरोबर समाजाचा देखील फायदा होईल. जमीन, वहान, मशनरी संबंधीत चांगले योग आहेत. परिवारात वाद करू नका. ईश्वराविषयी श्रद्धा वाढेल.

मकर: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर
कामामध्ये यश न आल्यामुळे आपल्याला चिंता सतावेल. भाऊ, मित्र यांच्या बोलण्यामुळे मन दुखावेल. व्यापारात नुकसान होण्याची शयता असून उपन व खच बरोबरीने राहील.



कुंभ : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व
सामान्य स्तरावरचे कामे होतील. योजना सफल राहतील. समाजात यश आणि प्रतिष्ठा वाढेल. दिखाव्यापासून दूर रहा. व्यापारात, नोकरीत लाभदायक योग आहे.

मीन : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व
शुभ बातम्या कळाल्यामुळे दिवस चांगला जाईल. राजकारणापासून दूर रहा. पारिवारीक समस्या सुटतील. प्रवास सुखकारक होईल.

२७ मार्चला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, नेपच्यून आणि मंगळाचा दुहेरी प्रभाव आहे. तुम्ही मनाने हळवे आहात. इतरांबल तुमच्या मनात खूप सहानुभूती असते. त्यांची दु:खे दूर करण्यासाठी तुम्ही सतत प्रयत्न करता. सत्ता व अधिकार उपभोगण्यासाठीच आपला जन्म झाला आहे अशी तुमची धारणा असते. तुमचा आत्मविश्वास कधी कमी होत नाही. शत्रूबाबत कारस्थाने करणे तुम्हाला आवडत नाही. समोरासमोर लढत द्यायला तुम्हाला आवडते. त्यामुळेच ज्युडो, कराटे वगैरे खेळात तुम्ही रस घेता. तंत्रनैपुण्यही, सहज प्राप्त करून घेऊ शकता.

फाजील आत्मविश्वासाने पेलता येणार नाही असे आव्हान स्वीकारू नका. आपल्या पदावरच कार्यक्षमता उंचावून दाखवा. संताप, शीघ्रकोपीपणा यामुळे डोकेदुखी, उ रक्तदाब, अल्सर सारखे विकार निर्माण होतील. मनाचा समतोल कायम ठेवा.

कार्यक्षेत्र : कुणाच्या हाताखाली काम करायला तुम्हाला आवडत नाही. तुमचा व्यवसाय स्वतंत्र एकट्याने करावे असे तुम्हाला वाटते. पण त्यासाठी अनुभव मिळवण्यासाठी यंत्रशाळा, कारखाने, यंत्रसामग्रीची रचना व प्रस्थापना वगैरे क्षेत्रात काम करणे आवश्यक आहे. तांत्रिक निपुणता अंगी असल्याने अभियांत्रिकीच्या सर्वच शाखा व त्यातल्या त्यात इंधने, ऊर्जा, ऑटोमोबाइल्स, वीज क्षेत्रात शिरकाव करून घेऊ शकाल व उत्कर्षही करून घ्याल.

प्रणयी जीवन : स्वभाव उतावळा असल्याने तुम्ही आपली प्रेमभावना व्यक्त करून मोकळे होता. पण त्यात प्रेमभंगाची शयता अधिक असते. इतरानी आपल्यावर वर्चस्व गाजवणे मान्य नसल्याने २१ मार्च ते २० एप्रिल दरम्यान जन्मलेल्या व्यक्ती टाळा. शारीरिक आकर्षक, सुंदर व्यक्तिमत्व हवे असल्याने २१ एप्रिल ते २० मे दरम्यान जन्मलेल्या व्यक्ती तुमच्या प्रीतीला प्रतिसाद देतील.

वर्षफळ : बऱ्याचशा कामात यश मिळाल्याने आत्मविश्वास कायम राहील. नवी आव्हाने स्वीकारून ती यशस्वी करून दाखवाल. जानेवारी फेबुवारी मध्ये नव्या जागा खरेदीचे व्यवहार करण्यास हरकत नाही. एप्रिल मे मध्ये स्वतंत्र वा भागीदारीत व्यवसाय करण्यास अनुकूल गहमान लाभेल. ऑगस्ट सप्टेंबर मध्ये राजकीय क्षेत्रात घणाघाती वकृत्वामुळे, आक्रमक धोरणाने आघाडीवर रहाल. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये विदेशी कंपन्यासाठी काम करण्याची संधी मिळेल.

महत्वाचे वर्ष : ९, १८, २७, ३६, ४५, ५४, ६३, ७२, ८१.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटिंग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# भोपा स्वामीनं दिली मआश्रम ४मोठी अपडेट, ओटीटीवर कधी प्रदर्शित होणार सीरिज



रीहीरा ४ : बॉबी देओलच्या 'आश्रम ४ ' या सीरिजची प्रेक्षक आतुरतेनं प्रतिक्षा करत असताना भोपा स्वामीनं दिली मोठी अपडेट

रीहीरा ४ : बॉलिवूड अभिनेता बॉबी देओल हा सध्या त्याच्या आगामी 'आश्रम' या सीरिजच्या पुढच्या भागामुळे आहे. या सीरिजमध्ये भोपा स्वामीची भूमिका साकारणाऱ्या चंदन रॉय सान्यालनं आश्रम ४' वर एक मोठी अपडेट दिली आहे. चंदननं नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत या सीरिजविषयी वक्तव्य केलं आहे. जर बॉलिवूड अभिनेता बॉबी देओल हा सध्या त्याच्या आगामी 'आश्रम' या सीरिजच्या पुढच्या भागामुळे आहे. या सीरिजमध्ये भोपा स्वामीची भूमिका साकारणाऱ्या चंदन रॉय सान्यालनं आश्रम ४' वर एक मोठी अपडेट दिली आहे. चंदननं नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत या सीरिजविषयी वक्तव्य केलं आहे. जर

चंदननं लाइव हिंदुस्तानला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं की तो जिथे ही जातो तिथे लोक त्याला त्याच्या आश्रम' या सीरिज विषयी विच- ारत असतात. त्याचा पुढच्या सीझन कधी येणार याविषयी विचारत असतात. अशात चंदननं आश्रम-४' च्या प्रदर्शनाविषयी अपडेट देत सांगितलं की मला आश्रमच्या सगळ्या दर्शकांना सांगायचे आहे की आश्रम-४' यंदाच्या वर्षीच प्रदर्शित होणार आहे. सीरिजचं दिग्दर्शन झालं आहे आणि त्यासाठी सगळी तयारी झाली आहे. असं म्हटलं जातं आहे की  तर बॉलिवूड हंगामाला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं की शूटिंगचे काहीच भाग हे शूट करण्याचे बाकी आहेत. त्याशिवाय त्यानं सांगितलं की चंदननं फॅन्सवर त्याच्या प्रभावाविषयी देखील सांगितलं, त्यानं खुलासा केला की एक रिक्षा चालक पासून एक सर्जनपर्यं, हा शो सगळ्यांपर्यंत पोहोचला आहे आणि प्रकाश झा यांच्यामुळे सगळेच 'जपनाम' च्या रंगात रंगला आहे.

आश्रम-४' ही सीरिज डिसेंबर महिन्यात ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे. खरंतर अजूनपर्यंत या सीरिजच्या प्रदर्शनाची तारिख निश्चित झालेली नाही. आश्रम' च्या चौथ्या भागाचा टीझर जून २०२२ मध्ये प्रदर्शित झाला होता. बॉबी देओलनं टीझर शेअर करत कॅप्शन लिहिलं होतं की बाबा अंतर्यामी आहे, त्याला तुमच्या मनातील गोष्टी जाणून घ्यायच्या आहेत. त्यामुळे, आश्रम ३ च्या एपिसोडसोबत आश्रम ४ ची एक झलक देखील तुम्हाला दाखवत आहे. फक्त आणि फक्त एमएक्स प्लेअरवर. या सीरिजमधील बॉबी देओलची भूमिका 'काशीपुर वाले बाबा निराला' ही प्रेक्षकांमध्ये चांगलीच लोकप्रिय आहे. हेही वाचा : इरवश चळूरप उहर्हेंश चळूरप : ट्रेलरमध्ये अक्षय आणि टायगरवर भारी पडला साउथचा हा' अभिनेता

बॉबी देओलविषयी बोलायचे झाले तर तो सगळ्यात शेवटी ॲनिमल या चित्रपटात दिसला होता. त्याच्या या चित्रपटातील भूमिकेनं सगळ्यांना वेड लावलं. बॉबीला त्या चित्रपटात जास्त वेळ स्क्रिनवर पाहता आलं नाही याची खंत त्याच्या चाहत्यांनी व्यक्त केली होती.

# जागा वाटप रखडले, बंडाचे झेंडे फडकले

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली - चिमूर, भंडारा - गोंदिया व रामटेक या पाच मतदारसंघांत १९ एप्रिलला निवडणूक होणार आहे. तेथे उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली असून, बुधवार २७ तारखेपर्यंत ही मुदत आहे. मात्र अजूनही महाविकास आघाडी व महायुतीतील जागावाटपाचा गोंधळ संपलेला नाही. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचितला सोबत घेण्याचे महाविकास आघाडीचे प्रयत्न यशस्वी होण्याची शक्यता जवळपास मावळली आहे. दुसरीकडे राज ठाकरे यांच्या मनसेला सोबत घेण्यासाठी भाजपच्या प्रयत्नांना यश येणार की नाही? याबाबतचा सस्पेन्स अजूनही संपलेला नाही. जे आधीपासून एकत्र आहेत, त्यांच्यातही सर्व आलबेल आहे असे नाही. तीन वर्षे सत्तेत एकत्र राहिलेल्या महाविकास आघाडीत व सत्तेसाठी एकत्र आलेल्या महायुतीतही एकेका जागेसाठी घमासान सुरू आहे. संख्याबळ कमी असतानाही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला व अजित पवारांच्या राष्ट्रवादीला राज्याच्या सत्तेत बरोबरीचे स्थान दिल्यामुळे ते आपण सांगू त्या जागावाटपावर तयार होतील, असे भाजपला वाटत असावे. या दोन्ही पक्षांना एक अंकी जागा देऊन, स्वतः ३३ ते ३५ जागा लढवण्याचा भाजपचा विचार होता. उद्धव ठाकरेंना सोडून शिंदे यांच्यासोबत आलेल्या १३ विद्यमान खासदारांच्या जागा तरी त्यांना मिळणार की नाही, अशी स्थिती होती. पण शिंदे, अजित पवार यांनी ठाम भूमिका घेतल्याने भाजपचा दोन तृतीयांश जागा लढवण्याचा प्रयत्न यशस्वी होताना दिसत नाही. फोडाफोडीचे राजकारण करून जमा केलेल्या गर्दीमुळे शक्ती वाढण्याऐवजी त्यांची डोकेदुखी वाढल्याचे दिसत आहेत. गेल्या चार-साडेचार वर्षात महाराष्ट्रात राजकारणाचा पार चिखल झाला आहे. त्यामुळे यंदाची धुळवडही जोरात आहे.

शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन प्रमुख पक्ष फोडून, बहुसंख्य आमदार, खासदार बरोबर आले तरी महाराष्ट्रातील यशाबद्दल खात्री वाटत नाही. त्यामुळे आणखी मित्र जोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. काँग्रेसमधील काही बड्या नेत्यांना पक्षात आणल्यावर राज ठाकरे यांना महायुतीत आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी मागच्या आठवड्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना दिल्लीत बोलावले होते. या दोघांची तब्बल ४० मिनिटे त्यांची चर्चा झाली. या भेटीमुळे मनसे महायुतीत सहभागी होणार हे जवळपास निश्चित झाल्याचे मानले जात आहे. शिवसेनेचे दोन तृतीयांश खासदार, आमदार शिंदेंसोबत असले तरी सामान्य शिवसैनिक व शिवसेनेचा परंपरागत मतदार अजूनही उद्धव ठाकरे यांच्याच सोबत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे राज ठाकरे यांच्या रूपाने एक ठाकरे आपल्या सोबत आले तर त्याचा फायदा होईल. गर्दी खेचण्याची क्षमता असणारा वक्ता उपलब्ध होईल. असे त्यांना वाटत असावे; पण अमित शहा व राज ठाकरे यांच्या भेटीला आठवडा होत आला तरी अजून युतीची घोषणा होऊ शकलेली नाही. याचे कारण म्हणजे मनसेला लोकसभेचे दक्षिण मुंबई व नाशिक हे दोन मतदारसंघ हवे आहेत व एकनाथ शिंदे कोणत्याही स्थितीत नाशिक सोडायला तयार नाहीत. शिवसेनेचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे शिंदे यांच्यासोबत आहेत. एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव व खासदार श्रीकांत शिंदे यांनी मागच्या आठवड्यात तेच यावेळीही उमेदवार असतील असे जाहीर केले आहे. त्यामुळे शिंदे यांनी ही जागा प्रतिष्ठेची केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज ठाकरे यांची आज एका पंचतारांकित हॉटेलात प्रदीर्घ चर्चा झाली. बुधवारी मध्यरात्री देखील फडणवीस आणि राज ठाकरे यांची गुप्त बैठक पार पडली. अशा भेटी होतच असतात, असे सांगत फडणवीस यांनी अधिक बोलायचे टाळले; पण मनसेला नाशिकची जागा सोडण्यास शिंदे तयार नसल्याने कोंडी झाल्याची कुजबुज आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची गुरुवारी एका पंचतारांकित हॉटेलमध्ये जवळपास दीड तास चर्चा झाली; पण त्यानंतरही महायुतीतील जागावाटपाचा तिढा सुटलेला नाही. राज ठाकरे महायुतीत आल्यानंतर येणाऱ्या काळात एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना त्यांच्याकडे सोपवण्याची भाजपची रणनीती असल्याची कुजबुज राजकीय वर्तुळात आहे. त्यामुळे संशयकल्लोळ नाट्य सुरू झाले आहे.



**शिंदेंनी अंदाज चुकवला**

५० आमदारांचा पाठिंबा असतानाही ११५ आमदार असलेल्या भाजपने त्यांना मुख्यमंत्रिपद दिले; पण सरकारवर भाजपचाच अंकुश असेल, त्याचसाठी देवेंद्र फडणवीस यांना इच्छा नसतानाही उपमुख्यमंत्रिपद घ्यायला लावले गेल्याची चर्चा होती; परंतु गेल्या पावणेदोन वर्षात शिंदे यांनी सत्तेवर चांगली पकड घेतली आहे. भाजपने देऊ केलेल्या मूठभर जागा स्वीकारण्यास ठाम नकार दिला. विद्यमान खासदारांबरोबरच शिवसेनेचे प्राबल्य असलेल्या आणखी चार जागांवर दावा सांगितला आहे. शिरूर मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे विद्यमान खासदार अमोल कोल्हे शरद पवार यांच्या गटात आहेत. या जागेसाठी राष्ट्रवादीचा आग्रह होता; पण या मतदारसंघाचे पूर्वी प्रतिनिधित्व केलेले शिवाजीराव आढळराव शिंदे यांच्या सोबत आहेत. शिंदेंनी त्यांच्यासाठी आग्रह धरला. राष्ट्रवादीला जागा हवी असेल तर देऊ; पण उमेदवारी आढळरावांनाच द्यावी लागेल, ही अट राष्ट्रवादीला मान्य करायला लावली आहे. शिंदे गटाचे माजी मंत्री विजय शिवतारे यांनी बारामतीत अजित पवार यांच्या विरोधात दंड थोपटले आहेत. त्यांना माघार घ्यायला लावा, नाहीतर कल्याणमध्ये श्रीकांत शिंदे यांची अडचण करू या राष्ट्रवादीच्या इशाऱ्याची त्यांनी दखलही घेतलेली नाही.

**अजित पवार यांच्यापुढे आव्हान**

राष्ट्रवादी काँग्रेस एकसंघ असताना अजित पवार यांच्या शब्दाला वजन होते. महाविकास आघाडी सरकारमध्ये तर त्यांचीच दादागिरी होती. सवता सुभा स्थापन करून भाजपसोबत गेल्यानंतर त्यांना सत्ता मिळाली; पण त्यांच्यासमोरील प्रश्न मात्र वाढत चालले आहेत. बारामतीत सुप्रिया सुळे यांच्या विरोधात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. यामुळे पवार कुटुंबात फूट पडून अजित पवार एकाकी पडले आहेत. त्यांचे पूर्वीचे सगळे विरोधक जुने हिशोब चुकते करण्यासाठी पुढे सरसावले आहेत. विजय शिवतारे यांच्या पाठोपाठ इंदापूरचे हर्षवर्धन पाटीलही विरोधात उतरले आहेत. शिवतारे, हर्षवर्धन पाटील यांना विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या विरोधाचा फटका बसला होता. त्याची परतफेड करण्याची संधी ते सोडणार नाहीत. हर्षवर्धन पाटील भाजपत असल्याने पक्षाने आदेश दिल्यानंतर ते कदाचित शिवतारे यांच्यासारखा थेट विरोध करणार नाहीत; पण मदत करतील याची शक्यता कमीच आहे.

**रणजित निंबाळकर, नवनीत राणा विरुद्ध पुन्हा सगळे एकवटले**

माढा मतदारसंघाचे विद्यमान खासदार रणजित नाईक निंबाळकर यांना भाजपने पुन्हा उमेदवारी दिली आहे. यामुळे मोहिते पाटील, रामराजे नाईक निंबाळकर नाराज झाले आहेत. मोहिते पाटील यांना भाजपत आल्यापासून काहीही मिळालेले नाही. यावेळी लोकसभेची उमेदवारी मिळेल अशी त्यांची अपेक्षा होती; पण ती पूर्ण न झाल्याने त्यांनी उघडपणे विरोध केला आहे. तिकडे अमरावती मतदारसंघातून मागच्यावेळी नवनीत राणा काँग्रेस - राष्ट्रवादीच्या पाठिंब्यावर अपक्ष म्हणून निवडून आल्या होत्या; पण नंतर त्यांनी भाजपला पाठिंबा दिला. यावेळी त्यांनी भाजपच्या पाठिंब्यावर लढण्याची तयारी केली आहे. भाजपकडून लढण्याचीही त्यांची तयारी आहे; मात्र शिंदे गटातील आनंदराव अडसूळ व अजित पवार यांच्या गटाच्या संजय खोडके यांचा त्याला थेट विरोध आहे. बच्चू कडू यांनीही त्यांच्या विरोधात उमेदवार उभा केला आहे. राज्य पातळीवर तीन पक्ष एकत्र आले असले तरी अनेक जिल्ह्यात त्यांचे नेते परस्पर विरोधात उभे असल्याचे चित्र आहे. हे संघर्ष मिटवून निवडणुकीला एकसंघपणे सामोरे जाताना नेत्यांना बरीच कसरत करावी लागणार आहे.


**आघाडीतून आंबेडकर बाहेर, सांगलीवरून जुंपली**

प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला महाविकास आघाडीत सहभागी करून घेण्यासाठी गेल्या दीड महिन्यांपासून चर्चा सुरू होती; पण यात यश येण्याची शक्यता जवळपास मावळली आहे. महाविकास आघाडीसोबत चर्चा करण्यापूर्वी उद्धव ठाकरे व प्रकाश आंबेडकर यांनी युती करण्याची घोषणा केली होती; पण उद्धव ठाकरे यांच्याबद्दल नाराजी व्यक्त करत शिवशक्ती आणि भीमशक्तीची आघाडी आता राहिलेली नाही, असे वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी जाहीर केले आहे.

सांगलीच्या जागेवरून काँग्रेस व उद्धव ठाकरे यांच्यात वादाची ठिणगी पडली आहे. पक्षाचे दोन तृतीयांश आमदार, खासदार सोडून गेल्यामुळे शिवसेना (उद्धव ठाकरे) व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे दोन्ही पक्ष कमकुवत झाले असले तरी सक्षम नेतृत्व असल्यामुळे जागावाटपात त्यांचाच वरचष्मा आहे. त्यांच्यामागे काँग्रेसची फरफट होत असल्याबद्दल काँग्रेसमध्ये सुरुवातीपासून नाराजी होतीच. त्यातच शिवसेनेने सांगलीची जागा आम्हीच लढवणार असल्याचे सांगत दुहेरी महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांची उमेदवारीही जाहीर केली आहे. हिंगोलीची जागाही आम्हीच लढवणार असल्याचे खासदार संजय राऊत यांनी स्पष्ट केले आहे. याबद्दल काँग्रेसमध्ये नाराजी आहे. सांगलीची जागा कोणत्याही परिस्थितीत काँग्रेसला मिळालीच पाहिजे, त्यासाठी टोकाची भूमिका घ्यावी लागली तरी चालेल, अशी भूमिका काँग्रेस नेते व माजी मंत्री विश्वजित कदम यांनी घेतली. या पेचातून काँग्रेस श्रेष्ठींना तोडगा काढावा लागणार आहे.

**-अभय देशपांडे**

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# गाव म्हणजे आनंदाचे माहेरघर :अभिजीत देशमुख



लातूर / प्रतिनिधी: एन.एस.एस. शिबीर हे एक राष्ट्र सेवेचे उत्तम व्यासपीठ असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाज सेवा कार्यात पुढाकार घ्यावा. कारण गाव म्हणजे आनंदाचे माहेरघर आहे. असे मत दिशा प्रतिष्ठानचे श्री अभिजीत देशमुख यांनी शिऊर येथे राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित विशेष युवक शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले. या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी खा. डॉक्टर गोपाळराव पाटील हे होते. तर व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून युवा पत्रकार शशिकांत पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उपप्राचार्य सदाशिव शिंदे, पर्यवेक्षक प्रा. सोमदेव शिंदे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, सरपंच प्रा. सचिन सूर्यवंशी, उपसरपंच विलास सूर्यवंशी, पोलीस पाटील उद्धव बिडवे, यांची उपस्थिती होती.

मौजे शिऊर ता.जि. लातूर या गावात राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील रासेयो विभागाच्या वतीने दिनांक २३ ते २९ मार्च २०२४ दरम्यान आयोजित मयुवकांचा ध्यास, ग्राम-शहर विकास अभियानासाठी विशेष युवक श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. पूढे बोलताना अभिजित देशमुख म्हणाले की, देशात शाहू महाविद्यालयाचा विद्यार्थी असणे ही अभिमानाची बाब आहे. एन.एस.एस. शिबीर हे एक राष्ट्र सेवेचे उत्तम व्यासपीठ असून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी समाज सेवा कार्यात पुढाकार घ्यावा. शाहू पॅटर्नच्या मुळाशी प्राध्यापकांचे कष्ट मोलाचे आहे. नवनवीन क्षेत्रात शाहू महाविद्यालय प्रगतीच्या वाटा शोधत आहे. विद्यार्थ्यांनी नव नव्या प्रगतीच्या वाटा शोधाव्यात व उद्योजक बनावे. असे प्रतिपादन केले. प्रमुख अतिथी म्हणून युवा पत्रकार शशिकांत पाटील यांनी ही आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर म्हणजे सर्वांनुभव असतो. लातूर पॅटर्न च्या नावाने हे महाविद्यालय प्रसिद्ध आहे राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे राष्ट्राची सेवा करणारी लोक चळवळ आहे. स्वयंसेवकांनी राष्ट्रहितासाठी प्रमाणिकपणे सेवा करावी व देश एकसंघ ठेवण्यासाठी योगदान द्यावे. असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील म्हणाले की, शिऊर हे आदर्श ग्राम बनावे यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी हे गाव स्वच्छ करावे. प्ररिश्रमा शिवाय यश मिळत नसते म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी प्रयत्नवादी असला पाहिजे.

या उद्घाटन पर कार्यक्रमात राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी ही विद्यार्थी स्वयंसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, डॉ. भीमराव पाटील, प्रा. शुभम जाधव, महेश बिडवे, प्रा. प्रांजली कुंभार, प्रा . पुनम वावरगीरे, प्रा. रूपाली जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रकाश रोडिया यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. विजय गवळी व आभारप्रदर्शन डॉ. पुष्पलता त्रिमुखे यांनी केले.

# राज्य उत्पादन शुल्क लातूर विभागाची विशेष मोहिमे अंतर्गत धाब्यावर बसून दारू पिणाऱ्यांवर कारवाई





लातूर / प्रतिनिधी- राज्य उत्पादन शुल्क नांदेड विभागाचे विभागीय उपायुक्त श्री.बी.एच तडवी यांनी दिलेल्या निद शनानुसार लातूर जिल्ह्याचे अधीक्षक श्री.केशव.गो.राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क लातूर विभाग कारवाई करत १)रेणापूर तालुक्यातील वसंतनगर तांडा परिसरात विविधठिकाणी छापे टाकून ३९७००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एकूण दोन (२)लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून या कारवाईत हातभट्टी तयार करण्याचे ११०० लिटर रसायन हातभट्टी दारू जप्त करण्यात आली.

२)तसेच औसा रोड येथील एका धाब्यावर कारवाई करण्यात आली त्यात धाब्यामालकावर व धाब्यावर बसून दारू पिणाऱ्या वर असे दोघांवर कारवाई करण्यात आली सदर कारवाईत १२८०/- किमतीचा अवैद्य मुद्देमाल जप्त करण्यात आला.. ३)तसेच राज्य उत्पादन शुल्क उदगीर विभागाने संजय नगर, उदगीर येथे अवैद्य हातभट्टी दारू वाहतक करणारा ऑटो रिक्षा पाठलाग करून पकडला सदर कारवाईत ऑटो रिक्षा चालकाला अटक करून ३० लिटर हातभट्टी दारू व ऑटो रिक्षा जप्त करण्यात आला सदर कारवाईत एकूण २४८०००/- चा मुद्देमाल मिळून आला.

असे मिळून सर्व एकूण २८८९८०/- चा मुद्देमाल मिळून आला.सदर कारवाई मध्ये निरीक्षक- आर.एम चाटे,आर.एस.कोतवाल, दुय्यम निरीक्षक-एन.पी.रोटे, ए.के शिंदे, बालाजी कावळे, एस.पी माळुंगे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक -गणेश गोले, मंगेश खारकर, जवान-अनिरुद्ध देशपांडे, शंकर बागेलवाड, चालक-विक्रम परळीकर यांनी सहभाग घेतला. मार्च २३/०३/२०२४ रोजी ही कारवाई करण्यात आली या कारवाई मुळे लातूर जिल्ह्यातील अवैद्य धाब्यावर बसून दारू पिणारे,अवैद्य हातभट्टी देशी विदेशी दारूची वाहतूक करणारे, अवैध दारू विक्री करणाऱ्याचे धाबे दणाणले आहे.

# गुंगारा देणाऱ्या फरार आरोपींच्या २४ तासांत आवळल्या मुसक्या

तुळजापूर दि.२६ (प्रतिनिधी) - शहरातील एचडीएफसी बँक येथील कॅश भरण्यासाठी आलेल्या ड्रायव्हरने बोलेरो चार चाकी वाहनांमध्ये हवा भरतो म्हणून गाडी घेऊन जाऊन गाडीसह तब्बल ८५ लाख रुपये घेऊन फरार झाल्याची घटना घडली. याबाबत तुळजापूर पोलीस ठाण्यात २ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्या आरोपींच्या शोधासाठी वेगवेगळ्या ठिकाणी ३ पोलीस पथक रवाना झाली होती. परंतू तुळजापूर पोलिसांनी अखेर सुतावरुन स्वर्ग गाठीत २४ तासांच्या आत त्या आरोपींच्या मुस्क्या आवळून त्यांच्या ताब्यातून २४ लाख ८१ हजार रुपये हस्तगत करण्यात पोलिसांना यश मिळविले आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, हवा भरतो म्हणून गाडी घेऊन जाऊन तब्बल ८५ लाख रुपये घेऊन आरोपी फरार झाले होते. गुन्हा घडताच काही वेळेमध्ये पोलिसांनी तपास चक्र वेगाने फिरवून पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक गौहर हसन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रवींद्र खांडेकर यांच्या आदेशावरून सहाय्यक पोलीस निरीक्षक भालेराव हे तपास करत होते. पोलिसांनी सुतावरुन स्वर्ग गाठत ७२ तासांत आरोपीच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आले. हा गुन्हा घडताच पोलिसांनी सोलापूर येथील रवी किसन नामदास याच्या मुसक्या आवळून अटक केली. त्याच्याकडून ८५ लाख रुपयांपैकी २० लाख रुपये जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे . गुन्ह्यातील मुख्य आरोपी धाराशिव शहरातील दत्तनगर येथील सचिन विलास पारसे व धाराशिव शहरातील विकास नगर येथील महेश सुभाष वर्तक हे दोघं फरार होते. गोपनीय माहितीच्या आधारे व आरोपीच्या लोकेशनवरून ते आरोपी कर्नाटक येथील असल्याची पोलिसांना माहिती लागली. पोलिसांनी एक पथक तयार करून या मुख्य आरोपीच्या शोधासाठी कर्नाटक येथे जाऊन आरोपीला बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले आहे.

मुख्य आरोपी सचिन पारसे व महेश वर्तक या दोन्ही आरोपीकडून पोलिसांनी ४ लाख ८१ हजार रुपये जप्त केले आहेत. तिन्ही आरोपींकडून पोलिसांनी २४ लाख ८१ हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत. तर उर्वरित ६० लाख १९ हजार रुपयांचा पोलीस शोध घेत आहे. त्या आरोपींना २५ मार्च रोजी न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने गुन्ह्यामधील २ आरोपींना ६ दिवसांची पोलीस कोठडी सुनावणी आहे. या ६ दिवसांमध्ये एवढी मोठी रक्कम आरोपीने कोठे दडवली हे सिद्ध होणार असून आतापर्यंत ३ आरोपी आहेत. तसेच आणखीन किती आरोपी सहभागी आहेत ? हे हे पोलीस तपासांती सिद्ध होणार आहे.

# रोजगाराच्या संधी विद्यार्थ्यांमध्ये रुजवाव्यात :डॉ जयद्रथ जाधव

किनगांव (प्रतिनिधी )- आजचे युग हे स्पर्धेचे आणि ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाचे आहे. विद्यार्थ्यांनी कोणत्याही शाखेमधून शिक्षण घेतले तरी ते शिक्षण कौशल्याभिमुख असले पाहिजे. म्हणून मराठी आणि इतर भाषा विषयाच्या पदवी शिक्षणामधून विद्यार्थ्यांत ज्ञानाबरोबर कौशल्याची रूजवणूक करावी, असे प्रतिपादन डॉ. जयद्रथ जाधव यांनी केले.

महात्मा फुले महाविद्यालय किनगाव येथे ममराठी भाषा आणि रोजगारांच्या विविध संधीफ या विषयावर शनिवार २३ मार्च २०२३ रोजी एक दिवशीय ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्राच्या पहिल्या सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ जयद्रथ जाधव बोलत होते.

या पहिल्या सत्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय परळी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. राजकुमार यल्लावाड, श्री हावगी स्वामी महाविद्यालय उदगीर मराठी विभागातील डॉ. मल्लिकार्जुन तंगावार आणि राणी चन्नम्मा विद्यापीठ बेळगाव मराठी विभागाचे डॉ.मोजोद्दीन मुतवल्ली या सत्रात सहभागी होते.

या चर्चासत्राची भूमिका प्रस्ताविकातून प्रा डॉ भारत भदाडे यांनी स्पष्ट केली त्यानंतर या सत्रात बोलताना डॉ.यल्लावाड म्हणाले की, वर्तमानात शिक्षणाचा सहसंबंध ज्ञानाबरोबर त्याच्या उपजीविकेशी जोडला जात आहे. त्यामुळे व्यवसायाभिमुख शिक्षणाची आज गरज आहे. आजचे युग माहिती तंत्रज्ञानाचे युग असून या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मराठी भाषेत अनेक रोजगाराच्या संधी आहेत. विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मागे न लागता व्यापार, व्यवसाय, ब्लॉग लेखन, ऑडिओ बुक्स, स्टोरी लेखन, यामधून आपले करिअर घडवावे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून हजारो विद्यार्थ्यांनी करिअर घडविल्याची उदाहरणे त्यांनी दिली. डॉ.सांगळे यांनी मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम आपला न्यूनगंड झटकला पाहिजे. मराठी भाषेची कौशल्य आत्मसात करून रोजगार प्राप्त होतो. चांगले बोलणे यातून सूत्रसंचालन, वकिली व्यवसाय, समुपदेशक, जाहिरात मार्गदर्शक, प्रभावी वक्ता विद्यार्थ्यांना होता येते. परंतु प्रत्येक विद्यार्थ्यांनी कौशल्य प्राप्त करण्यासाठी जीव ओतला पाहिजे. डॉ. मल्लिकार्जुन तंगावार यांनी मराठी भाषा ही आमची सामाजिक, सांस्कृतिक वारशाची भाषा आहे. संत साहित्य पासून तिने आम्हाला संस्कारित केले आहे. आमच्या समाजाचे भरण पोषण केले आहे. म्हणून ही भाषा रोजगारातही नक्कीच भरण पोषण करेल. डॉ.मोजोद्दीन मुतवल्ली यांनी मराठी कन्नड भाषेचा सहसंबंध स्पष्ट करून मराठी कन्नड अनुवादात रोजगाराची मोठी संधी विद्यार्थ्यांना आहे. या दोन भाषेच्या साहित्यिक अदान-प्रधानातून एक नवा सामाजिक, सांस्कृतिक पूल दोन राज्यात निर्माण करता येणार आहे. याशिवाय प्रशासन, स्पर्धा परीक्षा, जाहिरात, पत्रकारिता, दूरदर्शन, रेडिओ, यामध्ये प्रचंड संधी आहेत. कार्यालयात मराठी भाषांतर, कायदेविषयक दस्ताऐवजाचे भाषांतर, संकेतस्थळांचे भाषांतर आणि दुभाषक म्हणून संधी आहेत.

या सत्राचा समारोप करताना डॉ. जयद्रथ जाधव पुढे बोलताना मराठी भाषेतील रोजगाराच्या संधीचा आढावा घेत विद्यार्थ्यात कौशल्य क्षमता निर्माण करण्याची जबाबदारी ही त्या अध्यापकाची आहे. विद्यार्थ्यांच्या क्षमते अनुरूप एक कौशल्य त्याला प्रदान केले पाहिजे.यासाठी मराठी भाषेचे अभ्यासक्रम साहित्य केंद्री असण्यापेक्षा ते रोजगार केंद्री असले पाहिजे. अभ्यासक्रम कालानुरूप अद्ययावत करणे आवश्यक आहे. वर्गातला विद्यार्थी कोणत्या कौशल्यासाठी उपयोगाचा आहे हे समजून त्याला ते कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्राध्यापकांनी मदत केली पाहिजे. नवीन शैक्षणिक धोरणातून सरकारची हीच भूमिका आहे. सुशिक्षित बेरोजगारांचे समूह निर्माण करण्यापेक्षा हा सुशिक्षित वर्ग अनेक कौशल्यात नैपुण्य प्राप्त करून त्याने समाजाची सेवा करून अर्थार्जण मिळविले पाहिजे.ही जबाबदारी खऱ्या अर्थाने विद्यापीठाची आणि अध्यापकाची आहे. म्हणून परिस्थितीला दोष न देता, माहिती तंत्रज्ञानाचा कुशल वापर करून रोजगारातील संधींचा शोध घेतला पाहिजे. यावेळी डॉ. जाधव यांनी अनेक उदाहरणे देऊन आपली भूमिका स्पष्ट केली. या सत्रात महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्थेचे सचिव डॉ. बबनराव बोडके, प्रा संजय जगताप, प्रा बालाजी आचार्य, डॉ. विरनाथ हुमनाबादे, डॉ सदाशीव वरवटे डॉ. बळीराम पवार डॉ.विजयकुमार ढोले, डॉ.रत्नाकर बेडगे, डॉ.सुधीर गरड, डॉ.गोरोबा रोडगे, डॉ. यादव सूर्यवंशी,डॉ. बबनराव गीते, डॉ. व्यंकटी पावडे, डॉ.संजय जगताप, डॉ.भिंगोले एकनाथ,डॉ.सुरेश शिंदे,डॉ. कांत जाधव डॉ.संजय पाटील, डॉ. शिवाजी परळे, डॉ.केशव अलगुले, उपस्थित होते.या सत्राचे सूत्रसंचालन डॉ.प्रभाकर स्वामी यांनी केले तर आभार डॉ.पांडुरंग कांबळे यांनी मानले.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात क्रांतिकारक भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना विनम्र अभिवादन



लातूर / प्रतिनिधी- भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. भारतीय स्वातंत्र्याचा लढा हा जगभर आदर्शवत ठरला आहे. यामध्ये क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे त्यामुळे भारतीयांनी शहिदांच्या कार्य कर्तृत्वाचा विनम्रपणे गौरव केला पाहिजे असे प्रतिपादन गणित विभाग प्रमुख डॉ. सुजित हंडीबाग यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासन, महाविद्यालय जयंती उत्सव समिती आणि गणित विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शहीद दिन प्राचार्य कक्षात संपन्न झाला. यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मंतोष स्वामी, प्रा. एस. एस. मनियार, प्रा. दीपक धावरे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, विनायक लोमटे, यशपाल ढोरमारे, गोपाळ तिरमले, श्रीशैल्य पाटील आणि योगीराज माकणे यांची उपस्थिती होती.

सर्वप्रथम क्रांतिकारक भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या प्रतिमेला सर्वांच्या उपस्थितीत पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी नामदेव बेंदरगे बोलताना म्हणाले की, ब्रिटिश सायमन कमिशनचा विरोध करणारे लाला लजपतराय यांचा इंग्रजांनी केलेल्या लाठीचार्जमध्ये मृत्यू झाला. या मृत्यूचा बदला घेण्यासाठी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांनी निर्णय घेतला. दि. १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सॉडर्सला गोळ्या घालून त्यांनी ठार केले. त्यावेळी इंग्रजांनी यांना फाशीची शिक्षा सुनावली. दि. २३ मार्च १९३१ रोजी तिघांनाही फाशी देण्यात आली आणि म्हणून आजचा हा दिवस सर्व देशभर शहीद दिन म्हणून साजरा केला जातो असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचा अध्यक्षिय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केला आभार प्रा. दीपक धावरे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतोष येचवाड आणि शुभम बिराजदार यांनी परिश्रम घेतले.

# लातूर येथे बालरक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण उत्साहात संपन्न

लातूर :- समग्रशिक्षा अंतर्गत विशेष प्रशिक्षण उपक्रमातील बालरक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण सरस्वती विद्यालय,बार्शीरोड, लातूर येथील सभागृहात उत्साहात संपन्न झाले.

प्रशिक्षण उद्घाटनसत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षणविस्तार अधिकारी चंद्रहांस म्हेत्रे तर उद्घाटक म्हणून लातूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी निवृत्ती जाधव व प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक हणमंत गवळी,नोडल मुख्याध्यापक सूर्यवंशी एस.एस.यांची उपस्थिती होती.सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यस्तरीय बालरक्षक नजीऊल्ला शेख यांनी केले.तर उपस्थित प्रमुख मान्यवरांनी सर्व बालरक्षकांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.एक गाव एक बालरक्षक या समता विभाच्या नियोजनानुसार लातूर तालुक्यातील प्रत्येक गावातील बालरक्षकांची या प्रशिक्षण सत्रास उपस्थिती होती. उपस्थित बालरक्षकांना विश्र्वास नामाची यावेळी शपथ देण्यात आली.

या प्रशिक्षण सत्रामध्ये - बालरक्षक चळवळ संकल्पना, वैशिष्ट्ये व भूमिका,समता विभाग कामकाज,बालकांचे हक्क सुरक्षितता आणि बालरक्षकांची भूमिका, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० निपून भारत मिशन, वयानुरूप प्रवेश व शाळा व्यवस्थापन समितीची जबाबदारी, आदर्श प्रमाणित संचालन प्रक्रिया एस ओ पी शाळा बाह्य मूलांचे सर्वेक्षण संदर्भात चर्चा व मार्गदर्शन,बालरक्षकांच्या उत्कृष्ट कामाचे सादरीकरण,बालरक्षक जिल्हा-तालुका समन्वयक समता विभाच्या कामकाज विषयक माहिती विश्र्लेषण व ग्रामस्तरावर कार्य करणाऱ्या बालरक्षकांचे अनुभव कथन, आणि शेवटी प्रश्नोत्तरे घेऊन शंका समाधान करण्यात आले.

प्रशिक्षण सत्रादरम्यान लातूर डायटच्या प्राचार्या डॉ.भागिरथी गिरी, जेष्ठ अधिव्याख्याता डॉ. सलगर साहेब, समता विभाग प्रमुख संतोष ठाकूर यांनी भेट देऊन प्रशिक्षणार्थी बालरक्षकांशी सुसंवाद साधला व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. बालरक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण सत्राचे सुलभा म्हणून नजीऊल्ला शेख, अनिल तापडिया, बालाजी सपाटे व लातूर तालुका समन्वयक समता विभाग श्रीमती सोमवंशी जे.जे.यांनी उत्कृष्ट रित्या काम पाहिले.





उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०

दररोज ४ शो




उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर

फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुगणालय

भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!

अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ · डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) · डॉ. दिपाली पाटील (MS)

डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) · डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष · व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर · लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



पान १ वरून

## राहुल...

लोकशाही आघाडी आणि माकपच्या नेतृत्वाखालील डावी लोकशाही आघाडी यांचेच वर्चस्व राहिले आहे. दक्षिणेतील राज्यांमध्ये आपले अस्तित्व निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न करणाऱ्या भाजपाने त्यामुळेच केरळमधील राजकारणात मुसंडी मारण्याचा निश्र्चय केल्याचे सुरेंद्रन यांना दिलेल्या उमेदवारीमुळे स्पष्ट होत आहे.

वायनाड हा तर काँग्रेसचा बालेकिल्ला

वायनाड हा काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो. मागील निवडणुकीत पारंपरिक अमेठी मतदारसंघातून पराभवाचा धक्का बसलेल्या राहुल गांधी यांना वायनाडने साथ दिल्याने त्यांना लोकसभेत प्रवेश करता आला होता. या निवडणुकीत तूर्त तरी राहुल यांनी वायनाड या एकाच मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली आहे. मागील निवडणुकीत या मतदारसंघात त्यांना कोणतेही आव्हान नव्हते. यावेळी मात्र, केरळमधील सत्ताधारी आघाडीचा घटक असलेल्या भाजपाने नी राजा यांना उमेदवारी दिली आहे. या उमेदवारीनंतरही राहुल गांधी यांनी आत्मविश्र्वास दाखवत हाच मतदारसंघ कायम ठेवला आहे. आता मात्र सुरेंद्रन यांच्या उमेदवारीमुळे त्यांच्यासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

कुन्नूमेल सुरेंद्रन यांच्यावर जबाबदारी

कुन्नूमेल सुरेंद्रन हे केरळमधील भाजपाचा आक्रमक चेहरा मानले जातात. मागील चार वर्षांपासून ते राज्य भाजपाचे नेतृत्व करत आहेत. काही वर्षांपूर्वी शबरीमला येथील मंदिरात महिलांच्या प्रवेशाला विरोध करणाऱ्या आंदोलनाचे त्यांनी नेतृत्व केले होते. भाजपाच्या युवा मोर्चाचे वायनाड जिल्हा अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले असल्याने त्यांना हा मतदारसंघ नवा नाही. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पतनमतित्त या मतदारसंघातून आणि नंतर पोटनिवडणुकीतही कोन्नी मतदारसंघातून त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. यंदा मात्र भाजपाने त्यांना थेट राहुल यांच्याविरोधातच रिंगणात उतरवून मोठी जबाबदारी अंगावर टाकली आहे.

## भाजपकडून...

खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांच्या उमेदवारीबाबत पक्षाने अद्याप निर्णय घेतलेला नाही. पक्षाने अद्याप कैसरगंज लोकसभा मतदारसंघातून नाव जाहीर केला नाही. यावेळी ब्रिजभूषण सिंह यांचे तिकीट कापले जाऊ शकते, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. मात्र, याबाबत अद्यापही सस्पेंस कायम आहे.

## संविधानाने...

सध्याच्या प्रकरणात या जोडप्याला मुलीच्या पालकांकडून जीवाला धोका निर्माण होण्याची भीती होती. त्यामुळे त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. त्यांचे प्रतिनिधित्व करणा-या वकिलाने सर्वोच्च न्यायालयाच्या एका निकालाचा हवाला दिला ज्यामध्ये असे म्हटले होते की प्रौढ जोडपे, कायदेशीररित्या विवाह करण्यास पात्र नसले तरीही, त्यांना एकत्र राहण्याचा अधिकार आहे. असे असले तरी सरकारने या याचिकेला विरोध करत म्हटले की, अशा जोडप्यांना संरक्षण दिले गेले तर ते समाजाच्या हिताचे होणार नाही कारण यामुळे समाजात वैमनस्यता वाढेल. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने या विषयावर केलेली निरीक्षणे लक्षात घेऊन उच्च न्यायालयाने दाम्पत्याने दाखल केलेल्या याचिकेला परवानगी दिली.

लहान वयात नातेसंबंध ठेवणे चुकीचे

यावेळी न्यायालयाने एवढ्या लहान वयात नातेसंबंध ठेवण्याचे परिणामही नमूद केले. न्यायालयाने म्हटले की, भारत हा असा देश नाही जिथे सरकारकडून बेरोजगार आणि अशिक्षितांना कोणताही भत्ता मिळत नाही. त्यामुळे, ज्यांना पालकांचा आधार नसतो त्यांना स्वत:साठी तसेच त्यांच्या जोडीदाराच्या उदरनिर्वाहासाठी काम करावे लागते.

## जहाजाच्या...

सिंगापूरचा झेंडा असलेले ३०० मीटर लांबीचे जहाज ब्रिजला धडकले होते.

अपघातामधील जीवितहानीची माहिती मिळू शकलेली नाही. बाल्टिमोरच्या महापौरांनी सांगितले की, त्यांना अपघाताची माहिती मिळाली आहे. बचावकार्य सुरु करण्यात आले आहे.

## मुंबई बनली...

वाढत्या आत्मविश्वासाचा पुरावा आहे, असे संस्थेचे अध्यक्ष आणि मुख्य संशोधक रूपर्ट हूगेवर्फ यांनी नमूद केले आहे.

फार्मास्युटिकल क्षेत्र ३९ अब्जाधीशांसह आघाडीवर

या अहवालात भारताच्या अब्जाधीशांच्या भरभराटीत योगदान देणा-या विशिष्ट उद्योगांचे वर्चस्व अधोरेखित केले आहे. ज्यात फार्मास्युटिकल क्षेत्र ३९ अब्जाधीशांसह आघाडीवर आहे. त्यानंतर ऑटोमोबाईल आणि ऑटो घटक उद्योग (२७) आणि केमिकल सेक्टर (२४) चा समावेश आहे. भारतीय अब्जाधीशांची एकत्रित संपत्ती तब्बल १ ट्रिलियन डॉलर इतकी आहे. जी जागतिक अब्जाधीश संपत्तीच्या ७ टक्के एवढी आहे. या आकडेवारीने देशाच्या महत्त्वपूर्ण आर्थिक प्रभावावर जोर दिला आहे.

मुकेश अंबानी देशातील सर्वाधिक श्रीमंत व्यक्ती

रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी हे भारतीय अब्जाधीशांच्या यादीत आघाडीवर आहेत. त्यांची एकूण संपत्ती ११५ अब्ज डॉलर एवढी आहे. अदानी समूहाचे संस्थापक गौतम अदानी हे ८६ अब्ज डॉलर एवढ्या संपत्तीचे मालक आहेत. त्यांच्या कंपन्यांच्या शेअर्समधील वाढीमुळे त्यांच्या संपत्तीत ३३ अब्ज डॉलरची वाढ झाली आहे.

चीनमध्ये मंदी

भारतातील अब्जाधीशांची संख्या वाढत असताना चीनमध्ये त्यांच्या संख्येत घट झाली आहे, असे अहवालात नमूद करत म्हटले आहे की, ङ्गचीनमधील एक वर्ष खराब होते. हाँगकाँगचा शेअर बाजार २० टक्क्यांनी खाली आला. शेनझेन १९ टक्के आणि शांघाय ७ टक्क्यांनी घसरला.फ रिअल इस्टेट आणि अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील संघर्ष तसेच चिनी शेअर बाजारातील कमकुवत कामगिरीमुळे चीनमध्ये मंदीचे वातावरण राहिले.

## महायुतीचे...

प्रचारक यादीवर एकत्र बसून चर्चा झाली आहे त्यामुळे ती यादी लवकरच जाहीर करण्यात येईल. राज्यातील लोकसभा प्रचारक म्हणून राष्ट्रवादीकडून धनंजय मुंडे हे अगोदरच जाहीर करण्यात आले आहे. अशा पध्दतीने आम्ही लोकांसमोर जाणार असून लोकांचा विश्र्वास आम्ही जिंकू आणि नरेंद्र मोदी यांना तिस-यांदा पंतप्रधान करण्यासाठी महाराष्ट्राचे बळ त्यांच्या पाठीशी उभे करू, असा निर्धार करण्यात आल्याचेही अजित पवार यांनी स्पष्ट केले. शिवसेनेचे विजय शिवतारे यांच्याबद्दल विचारले असता, शिवतारेंबद्दलचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच घेतील, असे अजित पवार यांनी स्पष्ट केले.

बारामतीत तुमच्या मनातीलच उमेदवार

कारण नसताना राष्ट्रवादीला केवळ तीन ते चारच जागा मिळणार, अशा बातम्या चालविल्या गेल्या; पण आमच्या कार्यकर्त्यांचे समाधान होईल अशा जागा आम्हाला मिळणार असल्याचे स्पष्ट करतानाच बारामतीमध्ये तुमच्या मनात आहे तोच उमेदवार मिळणार असल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले. सुनेत्रा पवारच राष्ट्रवादीच्या उमेदवार असतील, असे स्पष्ट संकेत त्यांनी दिले. २८ तारखेला उमेदवारांची नावे कळतील, असेही ते म्हणाले.

## आ.अमित...

असे सांगून त्यांना सर्व बूथप्रमुखांना पुढील कामासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अमर खानापुरे म्हणाले की, गाव पातळीवर ग्रामपंचायत निवडणुकीत ज्याप्रमाणे आपण नियोजन करतो त्याप्रमाणे नियोजन लोकसभा निवडणुकीत बूथप्रमुखांनी करावे या निवडणुकीचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. यावेळी डॉ.सतीश कानडे, विलासराव देशमुख युवा मंचचे लातूर शहराध्यक्ष विजय टाकेकर, माजी नगरसेवक आसिफ बागवान यांनी मनोगत व्यक्त केले, तर या बैठकीचे शेवटी आभार लातूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुभाष घोडके यांनी मानले.

# मतदान करणे ही तुमची जबाबदारी व कर्तव्य आहे

## प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे यांचे प्रतिपादन



चापोली / प्रतिनिधी- आपला भारत देश हा जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश आहे. लोकशाही वाचवण्याची जबाबदारी भारतीय नागरिकांची आहे. नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावलाच पाहिजे. मतदान करणे ही आपली फक्त जबाबदारी नसून हे आपले कर्तव्य आहे याची जाणीव प्रत्येक नागरिकांना झालीच पाहिजे असे प्रतिपादन संजीवनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ धनंजय नारायणराव चाटे यांनी केले.

ते संजीवनी महाविद्यालय व डॉ नारायणराव चाटे कॉलेज ऑफ फार्मसी चापोली येथे स्वीप उपक्रमांतर्गत लोकसभा निवडणूक २०२४ करीता पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था सचिव तथा चापोलीचे लोकनियुक्त सरपंच डॉ भालचंद्र नारायणराव चाटे हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ नारायणराव चाटे कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य सचिन घोळवे, संजीवनी कनिष्ट महाविद्यालयाचे उपप्राचार्य रमेश गुट्टे, संजीवनी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक चिमेगावे सह आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना प्राचार्य डॉ धनंजय चाटे म्हणाले की, प्रत्येक निवडणुकीत जास्तीजास्त ६५-७० टक्के मतदान होते. म्हणजे उर्वरित ३० टक्के नागरिक मतदान प्रक्रियेपासून दूर राहतात. देशाचे भविष्य कसे असावे याचा विचार करून प्रत्येक मतदारांनी यावेळी मतदान प्रक्रियेत सहभाग घ्यावा. मतदारांना पाच वर्षातून एकदाच संधी मिळते आपल्या मनासारखा व देशाचा हित जपणारा उमेदवार निवडून देण्याचा.

ही संधी यावेळी कोणाही गमावुनये व लातूर जिल्ह्यातून शंभर टक्के मतदान झालेच पाहिजे हा संकल्प इथे उपस्थित सर्व पालक, मतदारांनी करावा व आपल्या गावातील नागरिकांमध्ये जनजागृती करावी. यावेळी चापोली व परिसरातील गावातील पालक, नवमतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सृष्टी ग्रीन क्लब निर्मिती विद्यापीठाचा स्तुत्य उपक्रम: जगताप

लातूर / प्रतिनिधी- सध्या संपूर्ण विश्वामध्ये ग्लोबल वार्मिंगमुळे पर्यावरणामध्ये विविध समस्या निर्माण झाल्या. त्यामुळे मानवी जीवन धोक्यात आले आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या परिपत्रकान्वये प्रत्येक महाविद्यालयात ग्रीन क्लबची निर्मिती करण्यात येत आहे. त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण जनजागृतीचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन पर्यावरण तज्ञ तथा सह्याद्री देवराई मराठवाडा विभागीय समन्वयक सुपर्ण जगताप यांनी केले.

महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील आय. क्यु.ए.सी., पदवी, पदव्युत्तर आणि संशोधन केंद्र आणि सृष्टी ग्रीन क्लब द्वारा जागतिक जल दिनाचे औचित्य साधून जल जागृती सप्ताह अंतर्गत विस्तार व्याख्यान आयोजित करण्यात आले होते यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, प्रा. योगेश रेड्डी, ग्रीन क्लबचे मार्गदर्शक डॉ. बाळासाहेब गोडबोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पुढे बोलताना सुपर्ण जगताप म्हणाले की, आज देवराई प्रकल्पाच्या माध्यमातून विविध गावांमधून सयाजीराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण संवर्धनाचे उत्कृष्ट कार्य सुरू आहे त्याला महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.


## जाहीरनामा

रेणापुर येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात

कोर्टाचा शिक्का

दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ५७/२०२४
शशिकला व इतर ३ वि. निरंक
निशाणी क्र.

वारसाचे सर्टिफिकेटबद्दल

ज्यापेक्षा मयत सखाराम गोविंदराव सुरवसे, रा. घनसरगाव ता. रेणापूर जि. लातूर हे दि. ०४/०८/२०१९ रोजी लातूर ता. जि. लातूर येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार शशिकला गोविंद सुरवसे, रा. घनसरगाव ता. रेणापूर जि. लातूर हयांनी हया कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार १. शशिकला गोविंद सुरवसे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, २.भाग्यश्री सखाराम सुरवसे, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, ३.अधर्व सखाराम सुरवसे, वय १४ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क. आई भाग्यश्री सखाराम सुरवसे ४.दिगविजय सखाराम सुरवसे, वय १० वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा. क. आई भाग्यश्री सखाराम सुरवसे सर्व रा. घनसरगाव ता. रेणापूर जि. लातूर अर्जदार यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू सखाराम गोविंदराव सुरवसे, यांचे वारस सर्टिफिकेट देईल. तारीखः १९/०३/२०२४
पुढील तारीखः २७/०३/२०२४

लिपिक
दि.न्या.क.स्तर,
रेणापूर

सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय
क. स्तर रेणापुर

## जाहीरनामा

रेणापुर येथील सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात

कोर्टाचा शिक्का

किरकोळ दि. अर्ज क. ५८/२०२४
कमलबाई/-
निशाणी क. ७

वारसाचे सर्टिफिकेटबद्दल

ज्यापेक्षा कुंडलिक कुंडीबा नागरगोजे, राहणार रा. गोढाळा ता. रेणापूर जि. लातूर हे ता. २७/०९/२०२३ रोजी किंवा त्या सुमारास गौ. विलासराव देशमुख गर्व्हमेंट मेडीकल कॉलेज ॲण्ड हॉस्पीटल लातूर ता. जि. लातूर येथे मयत झाले आणि पुढील अर्जदारानी हया कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील प्रमाणे -अर्जदारः-१. कमलबाई कुंडलिक नागरगोजे, वय ७० वर्षे धंदा घरकाम
२ रुक्माजी कुंडलिक नागरगोजे, वय ४० वर्षे धंदा :- शेती दोघे रा. गोढळा ता. रेणापूर जि. लातूर ३. केराबाई बळीराम केदार, वय ५० वर्षे धंदा घरकाम रा. राजेवाडी ता. रेणापूर जि. लातूर ४ ज्ञानेश्वरी पंडीत लहाने, वय ४८ वर्षे धंदा घरकाम ५. रंजना पंडीत लहाने, वय ४६ वर्षे धंदा-घरकाम दोघी रा. गाकेगाव ता. रेणापूर जि. लातूर घरकाम ६. अंजली अर्जुन कराड, वय ४४ वर्षे धंदा- :- घरकाम रा. कृष्णा नगर, लातूर ता. जि. लातूर
यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर रादरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबददल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत कुंडलिक कुंडीबा नागरगोजे वारस असल्याबद्दल वारसा प्रमाणपत्र देईल
पुढील तारीखः १२.०४.२०२४
तारीख २६ माहे ०३ सन २०२४

क.लिपीक
सह दि.न्या.क स्तर,
रेणापूर

सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय
क. स्तर रेणापुर

## जाहीरनामा

रेणापुर येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापूर यांचे कोर्टात

कोर्टाचा शिक्का

दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ६७/२०२४
रूक्मिनबाई व इतर ४ वि. निरंक
निशाणी क.

वारसाचे सर्टिफिकेटबद्दल

ज्यापेक्षा मयत मोतीराम मर्गाजी घोडके, रा. गव्हाण ता. रेणापूर जि. लातूर हे दि. १६/१२/२०२३ रोजी कपिल नगर, लातूर ता. जि. लातूर येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार रूक्मीनबाई मोतीराम घोडके, रा. खाडगाव रोड कपिल नगर, लातूर ता. जि. लातूर हयांनी हया कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील
अर्जदार-१. रूक्मिनबाई मोतीराम घोडके, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, २. चंद्रजीत मोतीराम घोडके, वय ४६ वर्षे, धंदाशेती, ३. राहुल मोतीराम घोडके, वय ४३ वर्षे, धंदा शेती, ४. रोशनी पिराजी गोडबोले, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, ५.दीपीका शिवमूर्ती बनसोडे, वय ४७वर्षे, धंदा घरकाम, सर्व रा. खाडगाव रोड कपिल नगर, लातूर ता. जि. लातूर अर्जदार
यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मोतीराम मर्गाजी घोडके, यांचे वारस सर्टिफिकेट देईल.
तारीखः १९/०३/२०२४
पुढील तारीखः २४/०४/२०२४

क. लिपिक
दि.न्या. क.स्तर, रेणापूर

सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय
क. स्तर रेणापुर

## जाहीरनामा

लातूर येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर यांच्या न्यायालयात

कोर्टाचा शिक्का

वारसा प्रमाणपत्र अर्ज क. ५३५/२०२४
ललिता व इतर ३ वि निरंक
निशाणी कमांक ७.

वारसाचे सर्टिफिकेटबद्दल

ज्यापेक्षा मयत श्रीहरी जयवंतराव मस्के यांचा मृत्यु दिनांक १९/०४/२०१७ रोजी मौजे. लातूर, ता. जि. लातूर येथे झाला आहे. उपरोक्त प्रकरणात अर्जदार १. श्रीमती ललिता श्रीहरी मस्के रा. विक्रम नगर, लातूर, ता. जि. लातूर हा.मु. सुभेदार रामजी नगर, लातूर, ता. जि. लातूर २. शुभम पिता श्रीहरी मस्के रा. सुभेदार नगर, लातूर, ता. जि. लातूर ३. सचिन पिता श्रीहरी मस्के रा. सुभेदार रामजीनगर, लातूर, ता. जि. लातूर ४. प्रियंका भ्र. योगेश चव्हाण रा. वाटूळ, राजापूर, रत्नागीरी, जि. रत्नागीरी यांनी मयत श्रीहरी जयवंतराव मस्के यांचे वारस असले बाबत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार यांनी उपरोक्त प्रकरणात श्रीहरी जयवंतराव मस्के मृत्यूपश्र्चात अर्जदार यांना मयताचे कायदेशीर वारस घोषीत तसेच वारसाचे प्रमाणपत्र सरकारी व निमसरकारी कार्यालयात अर्जदाराचे नाव नोंदणी करण्यासाठी व ईतर कामासाठी त्याच्या हक्कामध्ये वारसाचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज केला आहे. त्यापेक्षा उपरोक्त अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हा जाहीरनामा प्रसिध्द झालेल्या तारखेपासून एक महिण्याच्या आत किंवा पुढील तारीख २५/०४/२०२४ रोजी पर्यंत या कोर्टात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात. या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्कशाबीत दिसल्यास अर्जदारास सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. २०२४
आज तारीख १५/०३/२०२४

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक,
दिवाणी न्यायालय
व. स्तर, लातूर

सहा. अधिक्षक,
दिवाणी न्यायालय
व. स्तर, लातूर.

## जाहीरनामा

रेणापुर येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात

कोर्टाचा शिक्का

दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ६९/२०२४
महानंदा व इतर २ वि. निरंक
निशाणी क.

वारसाचे सर्टिफिकेटबद्दल

ज्यापेक्षा शिवाप्पा सखाप्पा गाताडे, रा. तळणी ता. रेणापूर जि. लातूर हे दि. १६/११/२०२२ रोजी तळणी ता. रेणापूर जि. लातूर येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार महानंदा शिवा गाताडे, रा. तळणी ता. रेणापूर जि. लातूर हयांनी हया कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार १.महानंदा शिवा गाताडे, वय ७० वर्षे, धंदा घरकाम,२. संजय शिवाप्पा गाताडे, वय ५० वर्षे, धंदा शेती, ३. अनिल शिवाप्पा गाताडे, वय ४५ वर्षे, धंदा शेती, सर्व रा. तळणी ता. रेणापूर जि. लातूर अर्जदार यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू नवलकिशोर बालाप्रसाद सारडा, चे वारस सर्टिफिकेट देईल.
तारीखः १९/०३/२०२४
पुढील तारीखः २२/०४/२०२४

क. लिपिक
दि.न्या.क. स्तर,
रेणापूर

सहायक अधिक्षक
(दिवाणी न्यायालय
क. स्तर रेणापुर

## जाहीरनामा

रेणापुर येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात

कोर्टाचा शिक्का

दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ८५/२०२४
गंगाबाई व इतर २ वि.
निरंक निशाणी क.

वारसाचे सर्टिफिकेटबद्दल

ज्यापेक्षा मयत दगडुसाहेब पिता धोंडीबा उर्फ धोंडीराम माने, रा. दर्जीबोरगाव ता. रेणापूर जि. लातूर हे दि. २४/०३/२०२२ रोजी दर्जीबोरगाव ता. रेणापूर जि. लातूर येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार गंगाबाई भ्र. दगडुसाहेब माने, दर्जीबोरगाव ता. रेणापूर जि. लातूर हयांनी हया कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार- १. गंगाबाई भ्र. दगडुसाहेब माने, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, २. परमेश्वर पिता दगडुसाहेब माने, वय ४० वर्षे, धंदा-मजुरी, ३. श्रीधर पिता दगडुसाहेब माने, वय ३६ वर्षे, धंदा मजुरी, सर्व रा. दर्जीबोरगाव ता. रेणापूर जि. लातूर अर्जदार यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू दगडुसाहेब पिता धोंडीबा उर्फ धोंडीराम माने, यांचे वारस सर्टिफिकेट देईल.
तारीखः २६/०३/२०२४
पुढील तारीखः ३०/०४/२०२४

क. लिपिक
दि.न्या.क.स्तर, रेणापूर

सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय
क. स्तर रेणापुर

## सुर्य कल्याण मुंबई रात्र

स्पेशल ४५/७८

| ५ | ८ | ९ |
|---|---|---|
| १४० | ३७८ | ४५० |
| ५२-५७ | ८०-८५ | ९१-९६ |

प्रो. दिपक कुमार

स्पेशल चान्ससाठी मेंबरशिप
नोंदणी चालू आहे. संपर्क साधावा.
१००% चान्स पास होणार

## गोल्डन विकली चान्सेस

मिलन (उदय/अस्त)(शनिवार)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २ | ३९० | ६ | २४० | ० | १४५ |
| | ४८० | | २६८ | | २३५ |
| | २२८ | | ३३० | | ५५० |
| | ९२-२१ | ३६-६७ | | ८०-०४ | |

कल्याण(उदय/अस्त)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | १३९ | १ | १४६ | ८ | १२५ |
| | २३८ | | ४७० | | २६० |
| | ६७० | | १०० | | ४४० |
| | ९३-३२ | ०१-१४ | | ७८-८६ | |

ता.२५ व २९ चे जबरदस्त चान्ससाठी
संपर्क करा
सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारी आहे. कृपया दुरुपयोग करु नये.
मोबा-९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ०-४ | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ७-० | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

दिवाळी बंपर चालू आहे 99 75 47 98 26

## दुकान भाडयाने देणे आहे

**शिवाजी चौक देगलूर रोड उदगीर १८ x ६५ ची ३ मजली ईमारत भाडयाने देणे आहे.**

संपर्क
शिवशंकर नागठाणे
मो.नं. ९८९०७१८५०५
मो.नं. ८३८०८३५५७५
मो.नं. ८६००१८६५५८





# यशवंत उदगीर

बुधवार दि. २७ मार्च २०२४

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com



## बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# ग्रामीण महाविद्यालय वसंतनगर येथे आरोग्य तपासणी शिबिर संपन्न




मुखेड-ग्रामीण ( कला,वाणिज्य व विज्ञान )महाविद्यालय,वसंत नगर ता.मुखेड जी.नांदेड येथे रसायनशास्त्र विभाग व चिन्नावार पॅथॉलॉजी नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे उद्घाटन फीत कापून संस्थेच्या उपाध्यक्ष श्रीमती चक्रावती गोविंदराव राठोड यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी श्रीमती मंदाकिनी धनाजीराव पवार,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हरिदास राठोड,संयोजक प्रा.डॉ.डी.सी.पवार,प्रा.डॉ.संजीव रेड्डी,स्टाफ सेक्रेटरी प्रा.डॉ.नागोराव आवडे हे मंचावर उपस्थित होते.

यावेळी या आरोग्य शिबीराचे महत्त्व प्राचार्य डॉ.हरिदास राठोड यांनी विशद केले.आपण वयाच्या चाळीशी नंतर सर्वांनी प्रत्येक वर्षी शारीरिक आरोग्या संबंधीत चाचण्या करून घेणे गरजेचे असल्याचे सांगितले.त्यानंतर दरवर्षी अशी शिबीरे घेण्यात यावीत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा.डॉ.डी.सी. पवार म्हणाले की आमचे सहकारी प्रा.डॉ. सुभाष देठे यांचा अचानक हृदय बंद पडून मृत्यू झाला.यामुळे आम्ही दुःखात बुडालोत.त्यांच्या श्रद्धांजली कार्यक्रम प्रसंगी सर्व कर्मचाऱ्यांचे आरोग्य तपासणी करण्याचे निश्र्चित झाले व त्यामुळेच आज हे शिबिर संपन्न होत आहे. यासाठी विमुक्त जाती सेवा समितीतील सर्व शाखांशी संपर्क केला आहे.

कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ. संजीव रेड्डी यांनी मानले.या शिबिरात एकूण रक्ताच्या दहा प्रकारच्या चाचण्या करण्यात आल्या. याचा एकुण ६५ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. अतिशय सवलतीच्या दरात रक्ताच्या विविध चाचण्या करून देण्यात चिन्नावार पॅथॉलॉजीचे सर्वेसर्वा डॉ.सुनिल व डॉ.सौ. सुनिता चिन्नावार यांचे सहकार्य लाभले.

शिबीर यशस्वितेसाठी चिन्नावार पॅथॉलॉजी लॅब नांदेडचे तंत्रज्ञ श्री मारोती मोरे व श्री गणेश तिडके व अनिकेत सूर्यवंशी तसेच महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा.सौ.अरुणा ईटकापल्ले,प्रा.डॉ.संजीवरेड्डी,प्रा.डॉ. डी.सी.पवार,श्री आनंद राठोड,प्रा. डॉ.नागनाथ शेटकार,प्रा.बालाजी राठोड,प्रा. बंडू पवार यांनी परिश्रम घेतले.



# देवणीत न्यायालयाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन

देवणी: प्रतिनिधी - देवणी येथील दिवाणी फौजदारी न्यायालयाच्या नूतन इमारतीचा उद्घाटन सोहळा शनिवारी पार पडला.

इमारतीचे उद्घाटन मुंबई तथा न्यायालयाचे न्यायमूर्ती मंगेश जि. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नीरज धोटे है प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश विजय पाटील होते. याप्रसंगी देवणी न्यायालयाचे न्यायमूर्ती अतीत प्र. सोल्लम यांच्यासह महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशनचेसदस्य ॲड. अण्णाराव पाटील, देवणी बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. शिवानंद मळभागे आदी उपस्थित होते.

यावेळी न्या. एन. एम. चव्हाण, न्या.एस टी. भालेराव, न्या. पी. डी. सुभेदार, न्या. एम. आय. वाडीवाले, नगराध्यक्षा डी. कीर्तीताई घोरपडे, ,ॲड बालाजी येनगे निलंगा उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. नितीन कट्टेकर, तहसीलदार गजानन शिंदे, पोलिस निरीक्षक माणिकराव डोके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता गणेश क्षीरसागर, गुतेदार विजय चिटे स्वामी यांच्यासह जिल्ह्यातील जेष्ठ विधीज्ञ न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# बौद्ध धर्मीय सामुहिक मंगल परिणय सोहळा उदगीर

उदगीर/प्रतिनिधी- उदगीर येथील कै. नामदेवराव सटवाजी गायकवाड बहुउद्देशीय सेवाभावी संस्था वतीने बौध्द धर्मीय सामुहिक मंगल परिणय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा सोहळा जिल्हा परिषद मैदान(तालुका क्रीडा संकुलन) उदगीर येथे दि. २६ मे २०२४ रोजी रविवार सांयकाळी ६. ४५ वाजता पार पडणार असल्याची माहिती पप्पू गायकवाड यांनी दिली.

कै. नामदेवराव सटवाजी गायकवाड बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दरवर्षी हा सामुहिक मंगल परिणय घेतला जातो. यंदाचा पाचवा सोहळा असुन या सामुहिक बौध्द धर्मीय मंगल परिणयात आपल्या पाल्यांचा विवाह करू इच्छिणाऱ्यांनी भन्ते नागसेन बोधी, मो.८२०८३६९६९६ विद्यासागर डोरणाळीकर,मो.९८२३६६००५२ गौतम गायकवाड, मो. ९६६५९९३३७५ अमोल तांबरे, मो. ९६७३६५२०३५ विनोद सोनकांबळे, मो.९०२२५०३८४२ यांच्याशी संपर्क साधून नाव नोंदणी करण्याचे आवाहन पप्पू गायकवाड मो.९८२२६९७४२४/ ८८५७८७७८७७ यांनी केले आहे. संपर्क कार्यालय - नगरपरिषद संकुलन खादी भंडार दुकानासमोर विंग डी उदगीर जिल्हा लातूर.

# विद्यार्थीनींसाठी तीन दिवसीय व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन

उदगीर/ प्रतिनिधी- पशुवैद्यकीय, मत्स्यविज्ञान आणि दुग्धतंत्रज्ञान महाविद्यालय, उदगीर येथील राजमाता जिजाऊ मुलींचे वसतिगृहामध्ये दिनांक १५ ते १७ मार्च २०२४ या कालावधीत विद्यार्थीनीचा व्यक्तिमत्व विकास या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा अधिष्ठाता डॉ. नंदकुमार गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सक्षम कक्ष, पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर तर्फे आयोजित करण्यात आली.

कार्यशाळेत प्रा. डॉ. भारती पाटील यांनी मुलींनी स्वत:चा व्यक्तिमत्व विकास कसा करावा, या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच मुलींनी अंतर्गत क्षमता वाढविणे, उत्साही बनणे, भावनांना काळजी पूर्वक हाताळणे, संकटांचा धैर्याने सामना करणे, या विषयांवर प्रभोधन केले. तसेच महिलांचे सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रात योगदान या विषयी माहिती दिली. भारतीय थोर महिला जसे राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले इ. यांच्या सामाजिक कार्याविषयी माहिती दिली. सौ. तनुजा तळेकर, योग शिक्षिका यांनी महिला व मुलींसाठीची उपयुक्त विविध योगासने, योगासनाचे फायदे आणि महत्त्व या विषयावर प्रात्यक्षिकासह माहिती दिली. डॉ. माधुरी शेळके, स्त्री-रोग तज्ञ यांनी महिलांमध्ये होणाऱ्या झउजऊ आणि झउजड या आजाराची कारणे, लक्षणे आणि त्यावरील प्रतिबंधक उपाय योजना या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या समन्वयक डॉ.मत्स्यगंधा पाटील, प्रभारी मुख्य वसतिगृह प्रमुख आणि अध्यक्षा, सक्षम कक्ष यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. सूत्रसंचालन कु. संकेती बिजूरकरने केले तर कु.तेजस्वीनी चव्हाणने कार्यशाळेच्या व्याख्यात्यांचे तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पद्धतीने सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

# २९ मार्च रोजी देगलूर - बिलोली मतदार संघात निवडणुकीचे प्रथम प्रशिक्षण

देगलूर (प्रतिनिधी): नांदेड - १६ लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने ९० देगलूर- बिलोली (९०) विभानसभा मतदारसंघाचे प्रथम प्रशिक्षण दि. २९ मार्च २०२४ शुक्रवार रोजी देगलूर शहरातील उदगीर रोडवरील सिध्देश्र्वर मंगल कार्यालय देगलूर येथे ०१ हजार ७५२ केंद्राध्यक्ष व इतर अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दोन सत्रात होणार असून प्रथम सत्र सकाळी ०९ ते ११ :३० आणि ११:३० ते ०१:३० व द्वितीय सत्र दुपारी ०१:३० ते ०३:३० व ०३ :३० ते ०५ :३० या कालावधीत संपन्न होणार आहे. या प्रशिक्षणासाठी देगलूर - बिलोली(९०) विधानसभा क्षेत्रातील सर्व एकूण ३४८ मतदान केंद्राचे क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश आहे.

या प्रथम प्रशिक्षणासाठी पुरूष ०१ हजार ४३४ पुरूष व ३०६ महिला तर १२ दिव्यांग असे एकूण ०१ हजार ७५२ यात केंद्राध्यक्ष, सहाय्यक केंद्राध्यक्ष, इतर मतदान अधिकारी व कर्मचारी आदींना दि. २६ मार्च मंगळवार रोजी आदेश पोहचले असून ते उपस्थित राहणार आहेत. ९० देगलूर - बिलोली विधानसभा मतदारसंघात एकूण ०३ लाख ०३ हजार १०० मतदार संख्या असून प्रथम प्रशिक्षणांमध्ये संपूर्ण पी.पी.टी. च्या माध्यमातून साहित्य हस्तगत करण्यापासून साहित्य परत करण्यापर्यंतचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. याशिवाय प्रत्यक्ष मतदान यंत्र कसे हाताळावयाचे प्रशिक्षण तज्ञ मास्टर ट्रेनर तथा क्षेत्रिय अधिकारी यांचे मार्फत दिले जाणार आहे.

प्रत्यक्ष प्रशिक्षणार्थी यांनी प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर ही मतदान प्रक्रिया पूर्ण कळाली आणि प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळल्या बाबतचे प्रमाणपत्र क्षेत्रिय अधिकारी यांना दिल्याशिवाय प्रशिक्षण पूर्ण होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन सहा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा बिलोली उपविभागीय अधिकारी सचिन गिरी, प्रशिक्षण विभाग प्रमुख तथा तहसीलदार राजाभाऊ कदम, बिलोली तहसीलदार श्रीकांत निळे, निवडणूक विभागाचे नायब तहसिलदार संजय नागमवाड, दिपक मरळे यांनी केले आहे.

# श्रीगणेश मुर्ती,महादेवलिंग नंदी व हनुमान मुर्तीची आज प्राणप्रतिष्ठापणा व कलशारोहण सोहळा

उदगीर (प्रतिनिधी) सोमनाथपुर नविन वसाहत नांदेड रोड येथे आज श्री गणेश मुर्ती, महादेवलिंग नंदी व मारोती प्राणप्रतिष्ठापणा व कलशारोहण सोहळा आज संपन्न होत आहे.

उदगीर शहरालगत असलेल्या सोमनाथपुर ग्रा.प.हद्दीतील विकास कॉलनी नांदेड रोड ग्रामिण पोलिस ठाणे उदगीर नजदिक भव्य मंदिर उभारण्यात आले असुन या ठिकाणी श्रीगणेश मुर्ती,महादेवलिंग नंदी व हनुमान मुर्तीची प्राणप्रतिष्ठापणा व कलशारोहण सोहळा आज बुधवार दि.२७ मार्च रोजी श्री गुरु हावगी स्वामी मठाचे मठाधिश डॉ.शंभूलिंग शिवाचार्य महाराज यांच्या शुभ हस्ते संपन्न होत आहे.बुधवार दि.२७ रोजी पहाटे चार वाजता पुजेस प्रारंभ व सकाळी दहा वाजता मुर्तीची प्राणप्रतिष्ठापणा व कलशारोहण कार्यक्रम संपन्न होणार असुन यावेळी डॉ.शंभूलिंग शिवाचार्य महाराज यांचे आशिर्वचन होणार आहे तरी या कार्यक्रमाचा भाविक भक्तानी उपस्थित राहुन लाभ घ्यावा असे आवाहन विकास कॉलनी व नविन वसाहत नांदेड रोड सोमनाथपूर यांनी केले आहे.

# उदगीर शहरातील सुजाण नागरिकांनी कर भरणा करून नगरपरिषदेस सहकार्य करावे व शास्ती टाळावी :सुंदर बोंदर

उदगीर/ प्रतिनिधी- शहरातील विविध विकास कामे होण्याकरिता त्याचबरोबर नागरिकांना मूलभूत सेवा सुविधा देण्याकरता नगरपरिषद कार्यालय सदैव तत्पर असते परंतु या सर्व कामकाजासाठी निधी देखील तेवढाच आवश्यक आहे जर नागरिकांनी आपल्याकडील पाणीपट्टी व घरपट्टी गाळा भाडे वेळेत भरले तर या सर्व कामासाठी नगरपरिषदेस सहकार्य होते. त्यामुळे नागरिकांना उदगीर नगरपरिषदेच्या वतीने जाहीर आवाहन करण्यात येते की, आपण आपल्याकडील चालू वर्षाची व थकीत मालमत्ता, पाणीपट्टी, गाळा भाडे कर भरून सहकार्य करावे.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात अद्याप पर्यंत मालमत्ता कर ७३ % पाणीपट्टी कर ३९ % या प्रमाणात नागरिकांनी भरणा केलेला आहे. यात पाणीपट्टी कराचे प्रमाण कमी आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील १५० अ तरतुदी नुसार दिनांक १ एप्रिल २०२४ नंतर ज्या नागरिकांकडे कराची थकबाकी असेल त्यांना एकूण थकबाकीवर दर महा २% (वार्षिक २४%) शास्ती (दंड) लागणार आहे. तरी नागरिकांनी आपल्या कडील चालू वर्षाची व थकीत मालमत्ता, पाणीपट्टी, गाळा भाडे कर भरणा करून शास्तीची कार्यवाही टाळावी यांची नोंद सर्व नागरिकांनी घ्यावी.

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि

दि.२०/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार मल्लिकार्जुन संजय निलंकर रा. पारकट्टी गल्ली उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक २५/०६/१९९५ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार मल्लिकार्जुन संजय निलंकर रा. पारकट्टी गल्ली उदगीर ता. उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक २५/०६/१९९५ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २०/०३/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक २५/०६/१९९५ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार नामे मल्लिकार्जुन संजय निलंकर रा. पारकट्टी गल्ली उदगीर ता. उदगीर यांचा जन्म दिनांक २५/०६/१९९५ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद उदगीर ता. उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २०/०३/२०२४ रोजी दिले

पूढे नेमलेली तारीख २१/०४/२०२४

**तालूका दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार उदगीर**

## जाहीरनामा

जा.क्र.२०२४/एमएजी/कावि

दि.२८/०२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार इफ्तेखार अब्दुल करीम पिंचनी रा. किल्ला गल्ली उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०५/०३/१९७३ रोजी मौजे उदगीर ता. उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला त्यांची जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार इफ्तेखार अब्दुल करीम पिंचनी रा. किल्ला गल्ली उदगीर ता. उदगीर यांनी त्यांचा जन्म दिनांक ०५/०३/१९७३ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक २८/०२/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

. त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०५/०३/१९७३ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार इफ्तेखार अब्दुल करीम पिंचनी रा. किल्ला गल्ली उदगीर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०५/०३/१९७३ रोजीची नोंद मुख्याधिकारी, नगर परिषद उदगीर ता. उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला नोंद घेणे बाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.
आज दिनांक २८/०२/२०२४रोजी दिले
पूढे नेमलेली तारीख २९/०३/२०२४

**- तालूका दंडाधिकारी तथा**
**तहसीलदार उदगीर**

## जाहिर सुचना

### सहयोग अर्बन को. ऑप बँक लि.

उदगीर प्रधान कार्यालय, शास्त्री कॉलनी, नवी आबादी, नगर परीषदेच्या पाठीमागे उदगीर.
: दैनंदिन ठेव (Pigmy) खातेधारकांसाठी जाहीर सूचना :-
सहयोग बँकेने नवीन उइड प्रणाली कार्यान्वीत केलेली असून, त्याअंतर्गत दैनंदिन ठेव संकलीत करणाऱ्या प्रतिनीधी (Pigmy -gent) साठी Mobile App दैनंदिन बचत ठेव संकलीत करण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. त्यानुसार खातेदाराने प्रतिनीधीकडे पैसे दिल्यानंतर व त्याची मोबाईल ॲप मध्ये नोंद केल्यानंतर दैनंदिन ठेव खातेदारांना त्याबाबतचा SMS बँकेकडून येतो.
सर्व दैनंदिन ठेव खातेदारांनी याबाबतची खात्री करावी. तसेच बँकेमध्ये संपर्क साधुन आपल्या खात्यावरील जमा रक्कमेची खात्री करावी, तसेच दर दोन महिन्याने आपल्या खात्यावरील (A/c Balance) रक्कम तपासून घ्यावे.

**आदेशावरून**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**